पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे । महिलांसाठी पादत्राणे । मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स,
स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज,
स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल,
बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे
वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका!
ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली,अ.नगर
मो : 9881531536




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०२.१०.२०२६ | अंक नं. १५६ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

उत्सव मजुरीचा, डबल फायद्याचा..
{ ₹999/- दागिन्यांच्या प्रतीग्रॅम मजुरीवर }
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना तेवढी टक्के मजुरीत सूट
1gm ते 10gm मंगळसूत्र 10% मजुरीत सूट
30gm चे मंगळसूत्र 30% मजुरीत सूट
40gm चे मंगळसूत्र 40% मजुरीत सूट
60gm चे मंगळसूत्र 60% मजुरीत सूट
80gm चे मंगळसूत्र 80% मजुरीत सूट
100gm चे मंगळसूत्र 100% मजुरीत सूट
ऑफर 14 सप्टेंबर 2026 ते 8 ऑक्टोबर 2026 पर्यंतच वैध
योजनेचे नियम : 1) सोन्याच्या प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू. 2) एका वेळेस एकाच योजनेचा लाभ घेता येईल.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

# मनपातील अनेक पदे रिक्त; नागरिकांच्या वाढल्या तक्रारी

## पदांवर अधिकाऱ्यांच्या तातडीने नियुक्त्या करा

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेत अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यामुळे त्या जागा रिक्त आहेत. तेथे बदलीने किंवा प्रतिनियुक्तीनेही अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे कामे रखडत असून, नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत. काही अधिकाऱ्यांकडे अनेक विभागांचा अतिरिक्त पदभार आहे. त्यामुळे त्यांच्यावर प्रशासकीय कामाचा अतिरिक्त भार पडत असून, नागरिकांचे विविध प्रश्न, कामे अडकून पडत आहेत. त्यामुळे महापालिकेविरोधात नागरिकांचा रोष वाढत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर रिक्त झालेल्या जागांवर प्रतिनियुक्तीने सक्षम अधिकाऱ्यांची तात्काळ नियुक्ती करावी, अशी मागणी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

या संदर्भात उपमहापौर जाधव यांनी मंत्र्यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे, महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधींच्या पदांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन महापौर, उपमहापौर तसेच विविध समित्यांच्या सभापती व उपसभापतींनी पदभार स्वीकारून ७ ते ८ महिने झाले आहेत. पदाधिकाऱ्यांमार्फत नागरिकांच्या विकासकामांसंबंधीच्या तक्रारींचे प्रमाण वाढले असून, या तक्रारींचे वेळेत निराकरण होणे गरजेचे आहे. तसेच महापालिकेच्या विविध प्रशासकीय व विकासकामांना गती देण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात अधिकारी वर्ग कार्यरत असणे अत्यंत गरजेचे आहे. सध्यास्थितीत महापालिकेतील अनेक अधिकारी अन्य ठिकाणी बदली होऊन गेले आहेत. त्यांच्या जागी बदली किंवा प्रतिनियुक्तीने अधिकारी वर्ग उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे उपलब्ध अधिकारी व कर्मचारी वर्गावर प्रशासकीय कामकाजाचा अतिरिक्त भार पडत असून, याचा थेट परिणाम महापालिकेच्या दैनंदिन कामकाजावर तसेच विविध विकासकामांच्या अंमलबजावणीवर होत आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये सध्या उपायुक्त - १, मुख्य लेखापरीक्षक - १, मुख्य लेखाधिकारी - १, सहायक आयुक्त - १, मूल्य निर्धारण व संकलन अधिकारी - १, शहर अभियंता - १ व वैद्यकीय आरोग्य अधिकारी - १ अशी महत्त्वाची पदे कार्यरत असून, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. तरी, अहिल्यानगर महानगरपालिकेतील प्रशासकीय कामकाज सुरळीत व गतिमान होण्यासाठी तसेच नागरिकांच्या विविध प्रश्न व तक्रारींचे वेळेत निराकरण होण्याच्या दृष्टीने वरील पदांवर प्रतिनियुक्तीने सक्षम अधिकाऱ्यांची तात्काळ नियुक्ती करण्याबाबत संबंधितांना आवश्यक ते आदेश देण्यात यावेत, अशी मागणी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी केली आहे.

भगवी ज्यांची सावली, हिंदुत्व ज्यांची शान...
अशा आमच्या कट्टर हिंदू भावाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
वाढदिवस ३ ऑक्टोबर

मा.श्री. संग्रामभाऊ रासकर
-शुभेच्छुक-
THE FITNESS CLUB shapeUP
स्वप्निल खडामकर
शिवाय उडपी
शाखा नं- १ भिस्तबाग चौक, सावेडी, अ.नगर
शाखा नं- २ बालिकाश्रम रोड, अ.नगर
संकेत खडामकर
अतुल (विकी) खडामकर
गणपत सालवी
व सर्व मित्र परिवार,अहिल्यानगर


द्वितीय पुण्यस्मरण
पाऊले चालतात दाही दिशांना पण त्यात बळ तुमचेच...
आव्हानांचा करतो स्विकार पण आशिर्वाद तुमचेच...
विशाल जरी जग सारे पण त्यात मायेची सावली तुमचीच...
आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली!
शोकाकुल
माधव यादव वाळके
सौ. सुनीता किशोर — किशोर माधव वाळके
डॉ. सौ.सुचिता संतोष — डॉ संतोष माधव वाळके
सौ. संगीता पांडुरंग — पांडुरंग मुरलीधर खपके
ॲड.सौ. स्वाती कैलास — कैलास सुर्यभान गडाख
डॉ.सौ.शिल्पा मिलिंद — मिलिंद जनार्दन वाळके
सौ. दीपा महेश — डॉ महेश जनार्दन वाळके
गंभा. सिंधूताई जनार्दन वाळके
कै.सौ.कांता माधव वाळके
स्व.दि.२/१०/२०२४
समस्त वाळके परिवार, आप्तेष्ट व नातेवाईक

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# घरकाम करणाऱ्या मोलकरणीने लांबविले पावणेतीन लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम, कॅम्पमध्ये गुन्हा दाखल

नगर -घरकाम करणाऱ्या मोलकरणीनेच घरातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा २ लाख ८६ हजारांचा ऐवज चोरी केल्याची घटना घटना समोर आली आहे. याप्रकरणी फिर्यादीच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जया कैलास मेहतानी (वय ४७, रा. जतीन हाईटस, विजय लाईन चौक, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या घरी प्रज्ञा लक्ष्मण केदारे ही महिला मोलकरीण म्हणून काम करत होती.तिने फिर्यादीच्या नकळत व त्यांच्या संमतीशिवाय घरातील कपाटातील सोन्याचे ब्रेसलेट, अंगठ्या, कानातील झुमके, सोन्याची चैन असे ५.६ तोळ्याचे सोन्याचे दागिने आणि चांदीचे दागिने तसेच ४० हजार रुपयांची रोकड असा २ लाख ८६ हजारांचा ऐवज लांबविला. ही बाब निदर्शनास आल्यावर जया मेहतानी यांनी १ ऑक्टोबर रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी संशयित आरोपी प्रज्ञा लक्ष्मण केदारे हिच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०६ नुसार गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पो.हे.कॉ. शाहीद शेख हे करत आहेत.




जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्त्याचे काम सुरु झाले असून, ठेकेदाराने हा रस्ता वाहतुकीसाठी बंद असल्याचा बोर्ड लावला आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्त्याचे काम सुरु

## सिमेंट कॉंक्रिटीकरणासह रुंदीही वाढणार

नगर - जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्त्याच्या कामाला २ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली असून, काम सुरू असताना हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात विविध कामांसाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी शासकीय विश्रामगृहाच्या मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयात प्रवेश करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हा रस्ता आता सिमेंट कॉंक्रिटीचा होणार असून, रुंदीही १५ मीटरपर्यंत वाढविण्यात येणार आहे.

माउली संकुलापासून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम मिस्कीन मळ्यापर्यंत पूर्ण झाले आहे. आता शेवटच्या टप्प्याचे काम सुरू करण्यात आले आहे. हा मार्ग मनमाड महामार्गापासून सुरू होऊन थेट छत्रपती संभाजीनगर महामार्गाला जाऊन मिळतो. याच मार्गावर जिल्हाधिकारी कार्यालय असल्याने या रस्त्यावर सातत्याने नागरिकांची तसेच वाहनांची वर्दळ असते. मात्र, रस्त्याचे काम सुरू झाल्याने या मार्गावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

संबंधित रस्त्याचे काम १५० कोटी रुपयांच्या निधीतून करण्यात येत आहे. हा रस्ता १५ मीटर रुंद करण्यात येणार असून, त्याचे संपूर्ण काम सिमेंट कॉंक्रिटीकरणातून केले जाणार आहे. रस्त्याची रुंदी वाढविण्यात येणार असल्याने या कामाच्या कक्षेत शासकीय विश्रामगृहाची भिंतही येत असून, ती काढण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

रस्त्याचे रुंदीकरण आणि सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम सुरु झाल्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी शासकीय विश्राम गृहाकडील गेट खुले करण्यात आले आहे. नागरिकांनी या पर्यायी मार्गाचा वापर करून जिल्हाधिकारी कार्यालयात प्रवेश करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गावठी कट्टा बाळगणाऱ्या तरुणाला पकडले



नगर - अवैध गावठी कट्टा बाळगणाऱ्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुणे येथील कोंढवा भागात पकडले असून त्याने पकडले असून त्याने पांढरी पुल परिसरातील मिनाक्षी कलाकेंद्राजवळील कच्च्या रस्त्याशेजारी रूईच्या झाडात पिशवीत लपवून ठेवलेला गावठी कट्टा पोलिसांनी जप्त केला आहे. अरूण उर्फ माऊली दत्तात्रय गणगे (वय ३२, रा. सुरेगाव दही, ता. नेवासा) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक १ ऑक्टोबर रोजी नेवासा पोलीस स्टेशन हद्दीत गस्त घालत असताना, अरूण उर्फ माऊली दत्तात्रय गणगे (रा. सुरेगाव दही, ता. नेवासा) याच्याकडे गावठी कट्टा असून तो गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नेवासा परिसरात शोध घेतला असता तो मिळून आला नाही. मात्र, तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे तो पुण्याच्या कोंढवा भागात लपून बसल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांच्या पथकाने तात्काळ पुणे येथील कोंढवा भागात शोध मोहीम राबवत आरोपी अरूण उर्फ माऊली दत्तात्रय गणगे याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन कसून चौकशी केली असता, त्याने आपल्याकडील गावठी कट्टा अहिल्यानगरमधील पांढरी पुल परिसरातील मिनाक्षी कलाकेंद्राजवळील कच्च्या रस्त्याशेजारी रूईच्या झाडात पिशवीत लपवून ठेवल्याची माहिती दिली.

त्यानंतर पोलिसांनी आरोपीला सोबत नेऊन पंचासमक्ष पांढरी पुल परिसरातील रूईच्या झाडाआड पांढऱ्या रंगाच्या पिशवीत गुंडाळून ठेवलेला ५० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा जप्त केला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे आर्म क्ट ३/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, अशोक लिपणे व किशोर शिरसाठ यांच्या पथकाने पार पाडली आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा तिसरा हप्ता मंजूर

## जिल्ह्यातील ९१६६ शेतकऱ्यांना मिळणार ८८.८१ कोटी रुपयांचा लाभ

नगर - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत कर्जमाफीचा तिसरा हप्ता मंजूर झाला असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील ९ हजार १६६ शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. या शेतकऱ्यांचे जिल्हा सहकारी बँक तसेच राष्ट्रीय व व्यापारी बँकांमध्ये असलेले पात्र पीक कर्ज माफ होणार आहे. तिसऱ्या हप्त्यासाठी एकूण ८८ कोटी ८१ लाख रुपये मंजूर झाले आहेत.

या तिसऱ्या हप्त्यात अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ६ हजार ७२७ शेतकरी पात्र ठरले आहेत. या शेतकऱ्यांचे जिल्हा बँकेतील ६२.८४ कोटी रुपयांचे पीक कर्ज माफ होणार आहे. यापूर्वी कर्जमुक्ती योजनेच्या दोन हप्त्यांमधून जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे. आता तिसऱ्या हप्त्यामुळे आणखी शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळणार आहे.

तिसऱ्या हप्त्याची रक्कम मंजूर झाल्यानंतर ही रक्कम संबंधित बँकांच्या खात्यात वर्ग होणार आहे. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवरील कर्जमाफीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. बँकांना पुढील तीन दिवस सुट्या असल्याने ५ ऑक्टोबरपासून संबंधित शेतकऱ्यांची कर्जखाती निल करण्यास सुरुवात होणार आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीची प्रक्रिया प्रत्यक्षात दिसून येणार आहे.

कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरणाला महत्त्व देण्यात आले आहे. कर्जमाफीच्या आधार प्रमाणीकरणासाठी एकूण १ लाख ३२ हजार ७०० शेतकरी प्राप्त झाले होते. त्यापैकी १ लाख २२ हजार ४४५ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण ९२ टक्के आहे. आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झालेल्या पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची पुढील कार्यवाही हप्त्यानुसार केली जात आहे. यापूर्वीच्या दोन हप्त्यांमध्ये जिल्ह्यातील मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे.

आजअखेर कर्जमाफीच्या पहिल्या आणि दुसऱ्या हप्त्यांतून अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील १ लाख २ हजार ५६३ शेतकऱ्यांच्या खात्यावर ९७६ कोटी रुपये जमा झाले आहेत. त्याचबरोबर राष्ट्रीय व व्यापारी बँकांमधील १२ हजार ६५२ शेतकऱ्यांच्या खात्यावर १३८ कोटी रुपये जमा झाले आहेत. अशा प्रकारे अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीय व व्यापारी बँका अशा सर्व बँकांमधील मिळून १ लाख १५ हजार २१५ शेतकऱ्यांच्या खात्यावर आतापर्यंत एकूण १ हजार ११४ कोटी रुपये जमा झाले आहेत.

तिसऱ्या हप्त्याच्या मंजुरीमुळे आता आणखी ९ हजार १६६ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार असून, त्यासाठी ८८ कोटी ८१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ६ हजार ७२७ शेतकऱ्यांच्या ६२.८४ कोटी रुपयांच्या पीक कर्जाचा समावेश आहे. त्यामुळे यापूर्वीच्या दोन हप्त्यांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनंतर आता तिसऱ्या हप्त्यातील पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया पूर्णत्वास जाणार आहे.

# नगरमध्ये इमारतीच्या बांधकामासाठी खोदकाम केल्याने जुना वाडा कोसळला

## वृद्ध महिला जखमी, जागामालक, ठेकेदार व जेसीबी चालकावर गुन्हा दाखल

नगर - शहरातील शहाजी रोडवरील संकलेचा बोळ परिसरात असलेल्या एका जुन्या वाड्याशेजारी सुरु असलेल्या बांधकामादरम्यान जेसीबीने मोठे खोदकाम केल्यामुळे वाड्याची भिंत कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या दुर्दैवी दुर्घटनेत वाड्यात राहणाऱ्या एक वृद्ध महिला गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर सिव्हील हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू आहेत. या प्रकरणी फिर्यादी कालिदास कृष्णनाथ रासने (वय ६५, रासनेवाडा, शहाजी रोड, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी जुनेद जलील तांबटकर (खान), बांधकाम घेणारा ठेकेदार आणि जेसीबी मशीन चालकाने संगनमत करून हे कृत्य केले आहे. शेजारीच जुना वाडा आणि रहिवासी असल्याचे माहिती असूनही, कोणतीही काळजी न घेता जेसीबीच्या साहाय्याने धोकादायक रितीने मोठे खड्डे खणण्यात आले. खोदकामामुळे वाडा कोसळू शकतो याची पूर्ण जाणीव असतानाही आरोपींनी सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष केले. या खोदकामामुळे वाडा कोसळला आणि सौ. अरुणा नंदकुमार बागवडे (वय ७२) या वृद्ध महिला जखमी झाल्या. याप्रकरणी कालिदास रासने यांनी दिलेल्या फिर्यादी वरून कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १२५, १२५ (अ), २९०, ३२४ (४)(५), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इलेक्ट्रिक मोपेड चोरणाऱ्याला पोलिसांनी २४ तासांत पकडले



नगर - शहरातील इम्पेरिअल चौक येथील वेलनेस मेडिकलसमोर उभी असलेली 'क्वांटम' कंपनीची मिलान मॉडेल इलेक्ट्रिक मोपेड दुचाकी (क्र.एमएच ०३ ईयु ५९३३) चोरणाऱ्या चोरट्याला पोलिसांनी अवघ्या २४ तासांत पकडले आहे. संतोष मोहन काळे (वय ३९,रा.खर्डे निवास,बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) असे या आरोपीचे नाव आहे. ३० सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास माळीवाडा भागातील इम्पेरिअल चौक येथील वेलनेस मेडिकलसमोर उभी असलेली मोपेड अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(ब) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तात्काळ हालचाली सुरू केल्या.घटनास्थळावरील गुप्त माहिती,सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी संशयिताचा माग काढला.

अवघ्या २४ तासांच्या आत पोलिसांनी संतोष मोहन काळे (वय ३९ वर्षे,रा.खर्डे निवास,बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) याला शिताफीने ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच संशयिताने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्याच्याकडून चोरीस गेलेली इलेक्ट्रिक दुचाकी पोलिसांनी जप्त केली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. विशाल चिटणीस, पोहेकॉ.सूर्यकांत डाके, विशाल दळवी, रमेश शिंदे, विनोद बोरगे, सूरज कदम, शिरीष तरटे, अतुल कोतकर, अतुल लोळगे, पवार, संकेत धिवर, अतुल लाटे, वैभव काळे, अतुल शेंडे, चालक संदीप शेंडगे, तसेच सायबर/मोबाईल सेलचे राहुल गुंडू, अरुण सांगळे आणि सीसीटीव्ही कक्षाच्या म.पो. हे.कॉ.प्रभावती कोकाटे यांनी केली आहे.

## दत्तात्रय आडेप यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पाईपलाईन रोड वरील सिमला कॉलनी येथील रहिवासी दत्तात्रय राजाराम आडेप (वय ५७) यांचे १ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ भाऊ, भावजया, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीनिवास आडेप यांचे वडील तर मल्लेशाम, लक्ष्मण आडेप यांचे ते बंधू होत.

# एटीएम कार्डची अदलाबदल करत १ लाख १० हजारांची फसवणूक

नगर - नगर शहराजवळील वाकोडी फाटा येथील स्टेट बँक परिसरामध्ये एका नागरिकाची एटीएम कार्डची अदलाबदल करत १ लाख १० हजारांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे.

याबाबत देवराम हरीभाऊ गायकवाड (वय ६३, रा. तुक्कडओढा, दरेवाडी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या भावजयीचे स्टेट बँकेत खाते असून त्याचे एटीएम कार्ड त्यांच्या कडे होते. ते एटीएम कार्ड अज्ञात व्यक्तीने हातचलाखीने बदलले. त्यानंतर ७ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत अनोळखी भामट्याने एटीएम कार्ड बदलून खात्यामधून वेळोवेळी पैसे लांबवले. विविध ठिकाणांहून एकूण १ लाख १० हजार ५०० रुपयांची रोकड काढून घेण्यात आली आहे. या प्रकरणी फिर्यादी देवराम गायकवाड यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद नोंदवली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४) नुसार गुन्हा दाखल केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

या प्रकरणाचा पुढील तपास स.फौ. धर्मनाथ पालवे हे करत आहेत. बँक किंवा एटीएम केंद्रावर पैसे काढताना नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांकडून केले जात आहे. अनोळखी व्यक्तीची मदत घेणे टाळावे आणि सतर्क राहावे, असे पोलिसांनी सुचवले आहे.पोलीस सध्या या प्रकरणी अज्ञात आरोपीचा कसून शोध घेत आहेत.

## हर्षवर्धन सोनवणे यांचे दु:खद निधन



नगर - आंबेडकर कॉलनी, भिंगार येथील रहिवासी हर्षवर्धन (किशोर) काशिनाथ सोनवणे (वय ६२) यांचे १ ऑक्टोबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते जिल्हा परिषदेत लेखा अधिकारी होते.

## सुनील भळगट यांचे हृदयविकाराने निधन



नगर - शिवराजनगर, पिंपळे सौदागर येथील रहिवासी सुनील हेमराज भळगट (वय ६४) यांचे २ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर काळेवाडी वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रतीक, रितेश भळगट यांचे वडील, धनराज भळगट यांचे पुतणे तर अनिल, सुबोध भळगट यांचे बंधू होत.

# नगरमधील डॉक्टरांनी केलेल्या दुर्मिळ शस्त्रक्रियेची रशियात चर्चा

## आंतरराष्ट्रीय नेत्रविज्ञान परिषदेत केले नेत्रशस्त्रक्रियेचे सादरीकरण

नगर - अहिल्यानगरमध्ये करण्यात आलेल्या एका दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या नेत्रशस्त्रक्रियेची थेट रशियातील मॉस्को येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नेत्रविज्ञान परिषदेत चर्चा झाली. अहिल्यानगरच्या स्वस्तिक आय इन्स्टिट्यूटचे नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी या परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करताना संधिवातामुळे कॉर्नियाला छिद्र पडलेल्या रुग्णावर केलेल्या दुर्मिळ शस्त्रक्रियेचे सादरीकरण केले. त्यांच्या या वैद्यकीय कामगिरीची रशियातील नेत्रतज्ज्ञांनी विशेष दखल घेत कौतुक केले. २३ ते २५ सप्टेंबरदरम्यान मॉस्को येथे ही आंतरराष्ट्रीय नेत्रविज्ञान परिषद झाली. या परिषदेत जगभरातील नेत्रतज्ज्ञ आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले होते. याच आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर डॉ. चौधरी यांनी अहिल्यानगरमध्ये केलेल्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेचे सादरीकरण केले.


डॉ. प्रफुल्ल चौधरी

संधिवातामुळे संबंधित रुग्णाच्या कॉर्नियाला छिद्र पडले होते. अशा स्थितीत रुग्णाची दृष्टी वाचवणे हे मोठे आव्हान होते. डॉ. चौधरी यांनी या रुग्णावर क्रेसेंट्रिक केराटोप्लास्टी ही दुर्मिळ शस्त्रक्रिया केली. या पद्धतीमध्ये केळ्याच्या आकाराच्या अर्धचंद्राकृती कॉर्नियल प्रत्यारोपणाचा वापर करण्यात येतो. गुंतागुंतीच्या परिस्थितीत रुग्णाची दृष्टी वाचविण्याच्या दृष्टीने ही शस्त्रक्रिया करण्यात आली. अहिल्यानगरमध्ये केलेल्या या शस्त्रक्रियेचे आंतरराष्ट्रीय परिषदेत सादरीकरण झाल्याने स्थानिक पातळीवर केलेल्या वैद्यकीय कामाला जागतिक व्यासपीठ मिळाले. डॉ. चौधरी यांच्या सादरीकरणाची रशियातील नेत्रतज्ज्ञांनी विशेष दखल घेत त्याचे कौतुक केले. याबाबत बोलताना डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी रुग्णांनी दाखविलेला विश्वास, शस्त्रक्रियेसाठी काम करणाऱ्या संपूर्ण टीमचे योगदान आणि अहिल्यानगरमध्ये केलेल्या वैद्यकीय कामाला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. स्थानिक पातळीवर केलेले काम आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणे हा संपूर्ण नगर शहरासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

# नगरच्या सीजेपी कार्यकर्त्यांचा मुंबईतील आंदोलनात सहभाग



नगर - मुंबईतील शिवाजी पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातून सीजेपीच्या कार्यकर्त्यांची टीम सहभागी झाली. आंदोलनासाठी मुंबईकडे रवाना होताना कार्यकर्त्यांनी घरूनच भाजी आणि चपाती सोबत आणली होती. आंदोलनस्थळी पोहोचल्यानंतर कोणताही दिखावा न करता कार्यकर्त्यांनी फुटपाथवर बसून घरून आणलेले जेवण एकत्रितपणे केले.

यावेळी डॉ. नितीन दिघे, सुशीलकुमार शेळके, महेश सटाले, प्रथमेश दरेकर, राजेंद्र सटाले, राहुल गांगर्डे, टी. डी. वणवे, सागर शेळके, पृथ्वीराज सुरते आणि पावन सुकासे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

अहिल्यानगर सीजेपी टीमने मुंबईतील आंदोलनात सहभागी होत आपली भूमिका मांडण्यासोबतच साधेपणा, परस्पर सहकार्य आणि संघभावनेचा संदेश दिला. घरून आणलेल्या भोजनाचा सर्वांनी एकत्रितपणे घेतलेला आस्वाद हा या सहभागातील वेगळा पैलू ठरला.

# गृहिणी

## आरोग्य

### अती प्रमाणात चहा पित असाल तर...

आपल्या भारत देशात सकाळची सुरुवात चहाने होते. घरोघरी चहा प्यायला जातो. पाहुणे आले की चहा, थंडी वाजली की चहा, डोके दुखले की चहा. थोडा चहा पिणे चांगले असते पण दिवसातून चार पाच वेळा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा चहा पिणे हे शरीरासाठी वाईट असते. चहामध्ये एक घटक असतो त्यामुळे आपल्याला जाग येते आणि बरे वाटते पण तोच घटक जास्त झाला तर आपल्या झोपेवर परिणाम होतो. जास्त चहा पिणाऱ्या लोकांना रात्री शांत झोप लागत नाही. सतत अस्वस्थ वाटते आणि मन घाबरल्यासारखे होते.जास्त चहा पिल्याने आपल्या पोटावर वाईट परिणाम होतो. छातीत जळजळ होते आणि पोटात आंबटपणा तयार होतो. अनेक लोकांना सकाळी काहीच खाल्ले नसताना रिकाम्या पोटी चहा पिण्याची सवय असते. त्यामुळे पोटाचे विकार सुरु होतात. पोट साफ होत नाही आणि भूक कमी होते. चहा जास्त पिल्याने शरीरातील पाणी कमी होते. कारण चहा प्यायल्यावर सारखे लघवीला जावे लागते. त्यामुळे शरीर सुकल्यासारखे वाटते आणि थकवा येतो. तसेच आपल्या दातांवरही डाग पडतात. दात पिवळे दिसू लागतात. चहामध्ये साखर आणि दूध जास्त असेल तर त्यामुळे वजन वाढते. रक्तातील साखर वाढू लागते. काही लोकांना चहा पिल्याशिवाय शौचाला जाता येत नाही अशी सवय लागते ती सवय खूप वाईट आहे. म्हणून दिवसातून दोन वेळा चहा पुरेसा आहे. सकाळी नाश्ता झाल्यावर आणि संध्याकाळी एकदा. शक्यतो कमी साखरेचा आणि कमी दुधाचा चहा प्यावा. चहापेक्षा कोमट पाणी, ताक, नारळाचे पाणी हे जास्त चांगले असते.

## पाककला

### गोड खांडवी

**साहित्य :** बेसन १ कप, आंबट दही १ कप, पाणी १ कप, साखर २ चमचे, हळद १/४ चमचा, मीठ चवीनुसार, आलं मिरची पेस्ट १ चमचा, तेल १ चमचा, फोडणीसाठी तेल २ चमचे, मोहरी १ चमचा, तीळ १ चमचा, कढीपत्ता ७-८ पाने, किसलेले खोबरे १ चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

**कृती :** एका भांड्यात दही, पाणी, बेसन, साखर, हळद, मीठ आणि आलं मिरची पेस्ट घालून गुठळी होणार नाही अशा प्रकारे चांगले एकजीव करा. हे मिश्रण गाळून घ्या. आता एका कढईत हे मिश्रण घालून मध्यम आचेवर सतत ढवळत शिजवा. मिश्रण घट्ट होऊन कडे सोडू लागले की गॅस बंद करा. लगेचच एका ताटाला किंवा ट्रेला मागच्या बाजूला थोडे तेल लावून हे मिश्रण पातळ थर देऊन पसरा. ५ मिनिटे थंड होऊ द्या. नंतर सुरीने लांब पट्ट्या कापून त्याच्या गुंडाळ्या करा. दुसऱ्या छोट्या कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, तीळ आणि कढीपत्ता घालून फोडणी करा. ही फोडणी तयार खांडवीवर घाला. वरून खोबरे आणि कोथिंबीर घालून गोड खांडवी सर्व्ह करा.

## वास्तू

### घराचे छत असे असावे

* घराच्या छताची उंची कमीत कमी १० ते १२ फूट असावी. कमी उंचीचे छत असेल तर घरात गुदमरल्यासारखे वाटते आणि नकारात्मकता वाढते.
* छताचा रंग नेहमी पांढरा किंवा हलका मलई रंग असावा. गडद रंगाचे छत कधीही करू नये.
* छताला नेहमी जाळे, धूळ लागू देऊ नये. महिन्यातून एकदा छत स्वच्छ करावे. याने घरात सकारात्मकता येते.

## सौंदर्य

* गालावर हलका गुलाबी ब्लश लावा. नाकावर आणि गालाच्या वर थोडा हायलायटर लावला तर चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते.
* साडीच्या रंगाची टिकली लावली तर अजून उठून दिसते. केसात मधोमध सिंदूर लावल्याने चेहरा भरलेला दिसतो.

## सल्ला

बरेच जण भजी फुगण्यासाठी सोडा घालतात. सोड्याने भजी लगेच मऊ पडतात. त्याऐवजी चिमूटभर बेकिंग पावडर वापरा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६

**कालाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, आर्द्रा २५।३०, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** – कामात यश दिसते. घरात आनंदाचे वातावरण राहील.

**वृषभ** – आज पैशाची आवक होईल. मित्रांची भेट होईल.

**मिथुन** – आज नवीन ओळखी होतील. प्रवासाचा योग आहे.

**कर्क** – आज कुटुंबासोबत वेळ जाईल. जुने वाद मिटतील.

**सिंह** – आज मान सन्मान वाढेल. मोठ्या लोकांची भेट होईल.

**कन्या** – आज मनातील इच्छा पूर्ण होईल. चांगली बातमी मिळेल.

**तूळ** – आज दिवस थोडा धावपळीचा जाईल.

**वृश्चिक** – आज जोडीदाराची साथ मिळेल. लाभाचा दिवस आहे.

**धनु** – आज रखडलेले काम पूर्ण होईल. भाग्याची साथ आहे.

**मकर** – आज नोकरीत प्रगती दिसते. वरिष्ठांची कृपा राहील.

**कुंभ** – आज शिक्षणात यश मिळेल. नवीन काही शिकायला मिळेल.

**मीन** – आज घरात पाहुणे येतील. गोड बातमी मिळेल.

## शब्दगंध क्र. ७५२८ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | | |
| ९ | | १० | | ■ | | ■ | |
| | ■ | | ■ | ११ | | १२ | |
| १३ | १४ | ■ | १५ | | ■ | | ■ |
| ■ | १६ | | | | ■ | १७ | १८ |
| १९ | | ■ | | ■ | २० | | |
| २१ | | ■ | २२ | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) अंथरण्याचे एक वस्त्र ४) दिन; वासर ७) घाण; विष्ठा ८) समुद्रात लागलेला अग्नी ९) मुस्लिम वर्षाचा नववा महिना ११) लढाऊ जहाजांचा ताफा; नौदल १३) क्षार; रामरस; लवण १५) एक द्रवरूप धातू १६) छत्रपती शिवाजी महाराजांचे द्वितीय सुपुत्र १७) ओळख; वशिला; लोकनाट्य तमाशातील एक भाग १९) भास्कर; रवि; सूर्य २०) उभा; सरळ; अगदी (पूर्ण उघड्या दाराचे विशेषण) २१) धागा; तंतू; दोरा; सूत २२) रक्षण करणारा; रखवालदार

**उभे शब्द :-** १) रणांगण; युद्धक्षेत्र; लढाईचे मैदान २) फार बारीक व मऊ ३) जीवित; उमर; आयुष्य; पाणी ४) दिनकर; सूर्य; भास्कर; रवि ५) अरण्य; जंगल; रान ६) स्त्रियांचे एक वस्त्र १०) झोपेचा अंमल संपणे ११) विसावा; विश्रांती; विराम १२) माणुसकी १४) ठरलेले; ठरविलेले १५) पराशर ऋषींचे पुत्र म्हणून महर्षी व्यासांना असेही म्हटले जाते १८) दाट; घन १९) गव्हाचे कणीदार पीठ २०) पाढ्यातील सहाची संज्ञा

### शब्दगंध क्र. ७५२७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| का | व | रा | बा | व | रा | ■ | अं |
| ट | ■ | ज | व | ■ | ज | र | ब |
| क | ळ | व | ळा | ■ | को | म | ट |
| ■ | ■ | ट | ■ | घा | ट | ण | ■ |
| मा | घ | ■ | दे | ह् | ■ | ■ | भा |
| त | ■ | ■ | वा | ल | ■ | भा | व |
| ब | ला | ब | ल | ■ | ना | रा | ज |
| र | थ | ■ | य | मु | ना | ■ | य |

### फिल्मीचक्कर क्र. १२५६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि | ल | ■ | त्तं | ■ | सा | ज | न |
| ल | क्ष्मी | कां | त | प्या | रे | ला | ल |
| ■ | छ | ■ | ■ | र | ■ | ल | ■ |
| सा | या | ■ | पा | कि | जा | ■ | अं |
| व | ■ | क | ■ | या | ■ | रा | जा |
| न | दी | म | ■ | तो | रा | म | न |
| भा | ■ | ल | य | ■ | जी | ■ | ■ |
| दो | स्ती | ■ | ■ | अ | व | ता | र |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** आयुष्य बदलायला वेळ लागत नाही, पण वेळ बदलायला आयुष्य लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मानवाने असंख्य शोध लावले असून त्याला 'टाईम ट्रॅव्हल'चा शोध लागेल का?

माणसाला नेहमीच वेळेवर नियंत्रण मिळवण्याची इच्छा राहिली आहे. आपण भूतकाळात जाऊन आपल्या चुका दुरुस्त कराव्यात किंवा भविष्यात जाऊन उद्या काय घडणार आहे हे आधीच पाहावे अशी स्वप्ने अनेकजण पाहतात. पण विज्ञानाच्या दृष्टीने हे कितपत खरे आहे हे समजून घेणे महत्वाचे आहे. थोर शास्त्रज्ञ आईनस्टाईन यांनी शंभर वर्षांपूर्वीच सांगितले होते की अवकाश आणि काळ या दोन वेगळ्या गोष्टी नसून त्या एकाच चादरीसारख्या आहेत. या चादरीला त्यांनी अवकाशकाल असे नाव दिले.

या चादरीवर जड वस्तू ठेवल्या की त्या चादरीला खळगा पडतो. जसे सूर्यामुळे अवकाशात खळगा पडतो आणि पृथ्वी त्या खळग्याभोवती फिरते. त्यांच्या सिद्धांतानुसार वेळ हा सगळीकडे सारखा जात नाही. जो माणूस स्थिर आहे त्याच्यासाठी वेळ वेगाने जातो पण जो माणूस खूप वेगाने धावतो आहे त्याच्यासाठी वेळ हळू जातो. यालाच शास्त्रज्ञ काळाचा विस्तार असे म्हणतात.

याचा पुरावा आपल्याला आजही मिळतो. अवकाशात पाठवलेले घड्याळ आणि पृथ्वीवर असलेले घड्याळ यांच्या वेळेत थोडा फरक पडतो. अंतराळ स्थानकात सहा महिने राहून आलेले अंतराळवीर पृथ्वीवरच्या लोकांपेक्षा काही क्षणांनी तरुण असतात कारण त्यांनी खूप वेगाने प्रवास केलेला असतो. त्यामुळे भविष्यात जाणे हे विज्ञानाच्या नियमानुसार शक्य आहे. जर आपण प्रकाशाच्या वेगाच्या जवळपास वेगाने जाणारे यान बनवले आणि त्यातून काही वर्षे प्रवास करून परत आलो तर पृथ्वीवर शेकडो वर्षे पुढे गेलेली असतील. म्हणजे एका अर्थाने आपण भविष्यात जाऊ.

पण सगळ्यात मोठा प्रश्न आहे तो भूतकाळात जाण्याचा. भूतकाळात जाणे हे खूपच कठीण आहे. त्यासाठी कालबोगदा नावाच्या गोष्टीचा विचार केला जातो. हा बोगदा म्हणजे अवकाशातील दोन वेगवेगळ्या काळांना जोडणारा एक आडवाटेसारखा रस्ता असतो. जर आपण त्या रस्त्यातून गेलो तर आपण एका क्षणात दुसऱ्या काळात पोहोचू शकतो. पण असा बोगदा तयार करणे किंवा शोधणे हे आजच्या तंत्रज्ञानाने शक्य नाही. त्यासाठी अशा ऊर्जेची गरज आहे जी संपूर्ण सूर्याच्या ऊर्जेपेक्षाही जास्त आहे आणि ती ऊर्जा ऋण स्वरूपात लागते जी आज आपल्याकडे नाही.

दुसरा एक मोठा अडथळा म्हणजे विरोधाभास. समजा तुम्ही भूतकाळात जाऊन तुमच्या लहानपणीच्या आजोबांना भेटलात आणि काही कारणाने त्यांना इजा केली तर मग तुमचा जन्मच होणार नाही आणि मग तुम्ही भूतकाळात गेलाच कसे हा प्रश्न तयार होतो. याला आजोबांचा विरोधाभास असे म्हणतात. त्यामुळे अनेक शास्त्रज्ञांना वाटते की निसर्ग स्वतःच अशा घटनांना रोखतो. आजच्या घडीला वेळेचा प्रवास ही फक्त कागदावरील गणिते आणि कल्पना आहे. भविष्यात कदाचित नवीन शोध लागतील आणि आपल्याला याचे उत्तर मिळेल पण तोपर्यंत आपल्यासाठी वेळ हा फक्त पुढेच जाणारा आहे.

### माणसाची ओळख

एका फळांच्या टोपलीत एक केळं आणि एक सफरचंद एकत्र ठेवले होते. सफरचंद खूप ताठर होते. त्याचा रंग लालभडक होता. त्याला स्वतःचा खूप गर्व होता. तो केळ्याला म्हणाला बघ मी किती सुंदर दिसतो. माझा रंग किती छान आहे आणि मी किती महाग आहे. लोक मला आवडीने खातात. तू तर साधं पिवळं आणि मऊ आहेस. तुझी साल पण लगेच काळी पडते. केळं काहीच बोललं नाही. ते शांत राहिलं.

काही दिवसांनी उन्हाळा खूप वाढला. टोपलीत ठेवलेले सफरचंद हळूहळू सुकू लागले. त्याच्यावर सुरकुत्या पडल्या. त्याचा लाल रंग फिकट झाला. पण केळं जरी बाहेरून काळं पडलं तरी आतून ते मऊ आणि गोडच राहिलं. तेव्हा त्या घरातील आजीने टोपलीत पाहिलं. तिने सुकलेले सफरचंद फेकून दिले आणि केळ्याचा शेक बनवून मुलांना दिला. मुलांनी तो आवडीने प्यायला. तेव्हा सफरचंदाला कळले की फक्त बाहेरच्या रंगाला आणि किमतीला महत्व नसते.

तात्पर्य – माणसाची ओळख त्याच्या बाहेरच्या देखाव्यावरून नाही तर त्याच्या आतल्या गुणावरून आणि नम्रतेवरून होते.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

होत जातो. शारीरिक व मानसिक दुःखांनी पीडलेला असा तो नेहमी कष्टांच्या भोवऱ्यात अडकून राहतो. हेच मला सांगायचे आहे. (अकारांगसूत्र २-६०, ७४)बायबलच्या नव्या करारात सांगितले आहे, धनाचा लोभ सर्व पापांचे मूळ आहे. (तीमुथियुस ६-१०) लोभी प्रवृत्ती आत्म्याच्या सहजप्रवृत्तीच्या विरुध्द आहे.

आत्म्याला वाटते की सारी सुखे पुण्य विश्वात वाटावीत. जे चांगले असेल ते आपल्या एकट्या जवळच ना सर्वांना त्याचा लाभ व्हावा असे त्याला वाटते.आपल्याजवळ जे काही आहे त्यात आत्मा संतुष्ट असतो. तसा तो का नाही ? असणारच कारण परमेश्वराशी एकरूपता ही त्याची सहज प्रवृत्ती असते. स्वतः स्वयंपूर्ण आहे. तो नेहमीच दिव्य आनंद आणि प्रसन्न स्थितीत राहतो. या जगातील क्षणभंगुर खेळणी नष्ट होणाऱ्या असतात. त्यांच्याकडे तो आकर्षित होत नाही. क्षणिक सुखवस्तू त्याला आकर्षक वाटत नाहीत. परमात्मा आनंद, चैतन्य व प्रेमाचा चिरस्थायी महासागरच आहे. परमात्माच आत्म्याच्या प्रसन्नतेचे स्रोत (मूळस्थान) आहे.

जेव्हा आपण आपल्या आत्म्याची ओळख करून घेतो तेव्हा लोभाच्या बंधनातून आपली सुटका होते. आम्ही समाधान पावतो; आणि आत्मामृताचे पान करतो. आम्हाला दुसऱ्याची संपत्ती बळकावण्याची इच्छा होत नाही. काही मिळवण्यासाठी आम्हाला हिंसेचा व धोकेबाजीचा मार्ग स्विकारावा लागत नाही. जेव्हा आम्हाला अंतरीय शांति मिळते, तेव्हा बाह्य आनंद नीरस होऊन जातात.आमच्या निर्मळ आत्म्यावर लोभ आपली छाप टाकतो. आम्ही आमच्या मनावर ताबा मिळवून आत्म्याला जागृत केले तर अमर्याद इच्छांच्या चक्राचा नाश करु शकतो. तेव्हा आम्ही आमच्या भाग्यावर खुश होऊ शकू. आपले ध्येय गाठून समाधानी होऊ शकू. शांत अवस्थेत राहून परमेश्वराकडून मिळणाऱ्या प्रत्येक वस्तूचा प्रेमाने स्वीकार करु शकू. अशा रितीने आम्ही आम्हाला जाळू पाहणाऱ्या लोभाच्या अग्नीला शांत करु शकतो. आत्मा जागृत झाल्यावर लोभाची धगधग आमच्यापर्यंत येतच नाही. आमचा बहुमोल वेळ, नाशवंत वस्तूंचा शोध घेण्यात आम्ही व्यर्थ घालवत नाही. उलट स्थायी स्वरूपाच्या टिकाऊ अशा आत्मिक खजिन्यांचा लाभ घेत पूर्णतः सम ाधानी होतो.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

मनातील अनेक प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतात. स्वतःला बरं करणं आणि वास्तवाचा स्वीकार करणं सोपं होतं.

सुरेश ओबेरॉय :

हे सगळं खूपच चित्तवेधक आहे. ही माहिती जर समजून घेतली तर प्रेमस्वरूप बनणं खूप सोपं होईल.

शिवानीदीदी :

हो. जेव्हा आपल्याला आध्यात्मिक सत्यं समजतात तेव्हा आपली प्रेमाची ऊर्जा 'माझ्या बरोबर असं का होतं आहे' किंवा 'घरातलाच असूनही हा माझ्याशी असं का वागतो' अशा प्रश्नांमुळे रोखली जाणार नाही. आता आपल्याला हे माहीत आहे की कोणतंही नातं हे प्रत्यक्षात दोन आत्म्यांमधला संबंध आहे.

सुरेश ओबेरॉय : गोष्टी आता खूप स्पष्ट झाल्या आहेत.ध्यान आणि चिंतनमी, एका आत्म्याच्या रूपात प्रदीर्घ प्रवासावर आहे... मी अनेक पोशाख धारण केले आहेत, अनेक परिस्थितींना सामोरा गेलो आहे आणि अनेक संस्कार निर्माण केले आहेत... आज मी या शरीररूपी पोशाखात आहे... आज माझी जी काही नाती आहेत, त्या सगळ्या आत्म्यांना मी पूर्वी भेटलो आहे... आईवडील, मुलं, भाऊ, बहीण – माझं या सगळ्यांबरोबर पूर्वीचं कार्मिक खातं आहे... माझ्यासाठी या नात्यांना समजणं, त्यांची ऊर्जा आणि त्यांच्या बाबतीत माझी वागणूक समजणं सोपं होत आहे... कारण त्या फक्त भूमिका नसून ते असे आत्मे आहेत ज्यांना मी पूर्वी भेटलो आहे... ऊर्जेची देवाण-घेवाण पूर्वीच झालेली आहे... तेच कार्मिक खातं आजही चालू आहे... मला माझ्या प्रश्नांची उत्तरं मिळायला सुरुवात झाली आहे... माझी वेदना बरी झाली आहे... प्रेमाची ऊर्जा जी रोखली जात होती, ती आता सहज भावाने प्रवाही होत आहे... ओम शांती!

प्रत्येक जन्मात आत्म्याचे आईवडील वेगळे, वातावरण आणि परिस्थिती वेगळी आणि त्यानुसार संस्कारही वेगळे असतात.अनेक जन्मांचे संस्कार बाळगणारा आत्मा बाळाच्या रूपात जन्म घेतो आणि ते बाळ आईवडिलांसारखंच असलं पाहिजे अशी आपण अपेक्षा करतो. त्या कुटुंबाच्या संस्कारांचा प्रभाव बाळावर पडतो पण त्याचे जास्तीतजास्त संस्कार त्याने पूर्वायुष्यातून आणलेले असतात. तुलना केल्याने, आईवडील आपल्यापेक्षा आपल्या भावंडावर जास्त प्रेम करतात असं मुलाला वाटतं. यातून त्याचा आत्मविश्वास कमी होतो आणि भावा-बहिणींतलं वैमनस्य वाढतं.जेव्हा इतरांनी त्यांचे संस्कार बदलावेत असं आपल्याला वाटतं, तेव्हा आपण त्यांना बळ द्यायची गरज असते. त्यांची प्रशंसा केल्याने आणि त्यांच्यातील सुंदर संस्कार अधोरेखित केल्याने त्यांना बळ मिळतं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक मुलगा परीक्षेत पेपर कोरा ठेवून आला.
बाबा – अरे असं का केलंस?
मुलगा – बाबा, शिक्षक म्हणाले होते, आपल्या मनातले लिहा.
माझ्या मनात काहीच नव्हते.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतात पहिली जनगणना कधी झाली?

– १८७२ साली

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

वंध्यत्वाची तपासणी करण्यासाठी डॉक्टरांकडे पती-पत्नी असे दोघांनीही जाऊन डॉक्टरांना वंध्यत्वाचे निदान करण्यास साहाय्य करावे. कारण पती-पत्नी दोघेही तपासणीस आले, तर वंध्यत्वाचे कारण लगेचच समजू शकते. वंध्यत्वाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी व उपचार निश्चिती करण्यासाठी डॉक्टरांना दोघांचीही शारीरिक तपासणी करणे गरजेचे असते. शारीरिक तपासणीनंतर दांपत्याला विश्वासात घेऊन त्यांना लैंगिक शारीरिक संबंधामध्ये काही अडचण आहे का याची विचारपूस करावी लागते. तसेच पतीला काही व्यसन आहे का? असेल तर व्यसन सोडून देण्यास सांगितले जाते. त्यानंतर रक्तगट, रक्ताचे प्रमाण, रक्तातील साखरेचे प्रमाण, गुप्तरोग, अशा दोघांच्याही प्राथमिक तपासण्या कराव्या लागतात.

लघवी तपासणी :यामध्ये जंतूसंसर्ग आहे का तसेच मधुमेह आहे का याचे निदान करता येते.

वीर्य तपासणी :वीर्यामध्ये शुक्रजंतूंचे प्रमाण प्राकृत आहे की नाही, त्यांची हालचाल चांगली आहे की नाही यासाठी वीर्य तपासणी करतात.

संप्रेरक तपासणी :

१) एल. एच.
२) एफ. एस. एच.
३) प्रोलॅक्टीन
४) थायरॉईड
५) टेस्टेस्टेरॉन
६) इस्ट्रोजन
७) प्रोजेस्टेरॉन
८) इन्सुलिन

सर्वच स्त्रीरुग्णांची संप्रेरकाची तपासणी करावी लागते असे नाही; परंतु काही रुग्णांची मासिकपाळी अनियमित होते किंवा येतच नाही. पाळीमध्ये अंगावरून खूप कमी किंवा जास्त जाते. पाळी फार उशिरा येते. पाळी न आल्यामुळे वजन खूप वाढायला लागते. चेहऱ्यावर पुरुषांसारखे दाढी, मिशाही दिसतात. आवाजात बदल होतो. चेहऱ्यावर, अंगावर जास्त लव दिसायला लागते. अशा वेळी डॉक्टर संप्रेरकाच्या तपासण्या करून घेतात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००




फिलीपिन्सच्या गुसी पीस फाउंडेशन या आंतरराष्ट्रीय संस्थेचे चेअरमन बॅरी गुसी, युवा व जनसंपर्क प्रमुख कोंच गुसी व शांतता पुरस्कार उपक्रमाचे प्रमुख मिको गुसी यांनी अहिल्यानगरच्या महावीर इंटरनॅशनल केंद्रास नुकतीच भेट दिली. यावेळी त्यांचा महावीर इंटरनॅशनलच्या वातीन्र सत्कार करून स्वागत करण्यात आले.

# 'महावीर इंटरनॅशनल नगर'च्या कार्याचे फिलिपाईन्सच्या पाहुण्यांनी केले कौतुक

नगर – फिलीपिन्सच्या गुसी पीस फाउंडेशन या आंतरराष्ट्रीय संस्थेचे चेअरमन बॅरी गुसी, जनसंपर्क प्रमुख कोंच गुसी व शांतता पुरस्कार उपक्रमाचे प्रमुख मिको गुसी यांनी अहिल्यानगरच्या महावीर इंटरनॅशनल केंद्रास भेट दिली. भारतीय पारंपारिक पद्धतीने झालेल्या स्वगताने परदेशी पाहुणे भारावले. यावेळी महावीर इंटरनॅशनलचे आंतरराष्ट्रीय संचालक अनिल जैन व नगर केंद्राचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

गुसी पीस फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'आशियातील नोबेल शांतता पुरस्कार' म्हणूनही संबोधले जाणारा हा गुसी शांततेचा पुरस्कार यंदा भारतातील महावीर इंटरनॅशनलला जाहीर झाला आहे. याची घोषणा करण्यासाठी फाउंडेशनचे चेअरमन बॅरी गुसी, कोंच गुसी व मिको गुसी हे भारतात आले. यादरम्यान त्यांनी अहिल्यानगरच्या महावीर इंटरनॅशनल केंद्रास भेट देऊन येथे होणाऱ्या सामाजिक कार्याचे गुसी परिवाराने कौतुक केले.

अहिल्यानगरच्या महावीर इंटरनॅशनल केंद्राचे अध्यक्ष राजेंद्र बोथरा यांनी बॅरी गुसी यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी स्वागत सन्मानाने भारावलेले मिको गुसी यांनी उत्स्फुर्तपणे फिलीपिन्स भाषेतील एकात्मतेचे गीत सादर करून कृतज्ञता व्यक्त केली.

सेक्रेटरी वसंत बोरा यांनी नगर केंद्राच्या विविध सामाजिक व गरजवंतांना केलेल्या उपक्रमांचा गोषवारा केला.

तसेच युवाचे अध्यक्ष चेतन संचेती यांनी या आढाव्याचे सादरीकरण केले.

बॅरी गुसी यांनी मनोगतातून नगरच्या केंद्राच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून गुसी पीस फाउंडेशनच्या जागतिक पुरस्कारा मागची भूमिका व उद्देश विशद केला. देशात महावीर इंटरनॅशनल मोठ्याप्रमाणात सामाजिक कार्यात पुढे येत वंचितांना मदतीचा हात देत असल्याने या वर्षीचा गुसी शांततेचा पुरस्कार भारतातील महावीर इंटरनॅशनलला देऊन सन्मानित करण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच डिसेंबर महिन्यात होणाऱ्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास नगर केंद्राच्या सर्व पदाधिकाऱ्यांना फिलीपिन्सला येण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले.

सूत्रसंचालन मेरू कर्नावट व नूतन संचेती यांनी केले. दिलीप कर्णावट यांनी आभार मानले. यावेळी नगर केंद्राचे सतीश लोढा, डॉ.सुरेश सुराणा, मानक कटारिया, अनिल लोढा, सुमित लोढा, अरुण पारख, नरेंद्र बाफना, मनोज शेटीया, वसंत बोरा, अमित पारख, धनराज संचेती, राजेंद्र बोथरा, दिलीप कर्नावट, गौतम बरमेचा, सतीश चोपडा, गौतम पारख यांच्यासह महिला विभागाच्या अध्यक्षा वर्षा बाफना, सेक्रेटरी अपर्णा बोथरा, वैशाली बाफना, उज्वला लोढा, अरुणा सुराणा, वैशाली शेटीया, सुनिता कर्नावट, सरला बरमेचा, सुरेखा संचेती, उज्वला बोथरा, उल्का पारख, स्नेहल बोथरा, स्मिता गदिया व सुरेखा पारख उपस्थित होत्या.

# प्रेरणादायी अक्षरधन

## क्षमता लक्षात घेणे जरुरीचे

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स




संत कबीर यांचा एक दोहा आहे चिंटी चावल ले चली बीच में मिल गयी दाल। ए चिटी दोनो ना मिले एक दे डाल एवढीशी मुंगी. केवढेशे बळ तिच्या अंगी ? चालली होती तोंडात तांदळाचा कण घेऊन. कीव करावी एवढा जीव तिचा. पण रात्रंदिवस वसा उद्योगाचा. सतत जीवन जमा करण्याचा. एक दाणा अनेकांत वाटायचा मिळाल्या क्षणीच. आपणच एकट्यानं नाही खायचा. एवढ्याशा मुंगीलादेखील समष्टीचे भान. तर अशा मुंगीला वाटेत जाता जाता दिसली डाळ. तोंडात तांदूळ, समोर डाळ, दोन्ही कसे तोंडात घालणार? पण तिचा प्रयत्न चालूच, की तांदळाबरोबरच तोंडात पकडायची डाळ. तांदूळ आणि डाळ धरायची तोंडी, तर केवढ बळ हवे अंगी ? स्वतःचाच जायचा तोल, मग सगळा प्रयत्नच फोल. ना ठरेल तांदूळ ना डाळ, म्हणून कबीर तिला म्हणतात, अगं. मनाशी ठरव., घ्यायचा तांदूळ की डाळ ? एकाचा कुणाचा तरी विचार गाळ. आपली क्षमता पाहावी. मग कामाची जबाबदारी घ्यावी. महाभारतकार महर्षी व्यास म्हणतात.

आदावेव मनुष्येण वर्तितव्यं यक्षाक्षम।
यथा नातीतमर्थ वै पश्चात्तापेन युज्यते।

आपली क्षमता बघावी. शरीर, मन आणि बुद्धी यांची झेप लक्षात घ्यावी. मग कार्य सफल होईल अशा प्रकारे पावले उचलावीत. क्षमतेबाहेरचे अंगावर घेतले की यश संपले. हाती काहीच न लागले. एरव्ही थोडेफार तरी लाभले असते, तेही गमावून पश्चाताप करणे कपाळी आले.

समर्थ रामदास म्हणतात.

वाट पुसल्याविण जाऊ नये, फळ ओळखल्याविना खाउ नये पडली वस्तू घेऊ नये।

एकाएकी गावाला जायचे आहे. समोर वाट दिसते आहे. म्हणून का एकदम धरायची ती? जवळची असलेही ती वाट. पण दगड, धोंडे, खाचखळगे आणि चिखलमाती, हे सगळे किती, याची विचारपूस करायला हवी. एरव्ही ठेचाळतील. रक्ताळतील पावले. मग गावाला पोहोचणे कुठून जमणार? दिसले फळ की तोडले दातांनी, असे करणं धोक्याचे. ते फळ ओळखण्याची क्षमता नसेल तर घ्यायचे नाही. निघाले विषारी तर जिवावर बेतणार. रस्त्यावरची वस्तू एकदम उचलू नये. ती चोराची असेल, तर मार खावा लागेल. सार असे की, विचार करावा आधी, मग जडणार नाहीत आधीव्याधी.

चुके, ठके, विसरे, सोडी। आठवण झालीया चरफडी ।

आपली ताकद ओळखून न वागले की चुकले. त्यात तुम्ही फसणार यश दुरावणार. काम विसरले, अर्धेच टाकून दिले. ही सगळी फजिती आठवली, की चरफडण्यापलीकडे कोणती गोष्ट हाती ठरणार ? या कारणे सावधान । एकाग्र असावे मन।। म्हणून सावधपणे वाट धरावी. आपल्या क्षमतेचा विचार करायला मन स्थिर करावे.

– किशोर गांधी

# कमाईसोबत आर्थिक नियोजन, बचत आणि गुंतवणुकीची शिस्त आवश्यक : सुधीर भगत

## ऐसा संस्थेच्या सभासदांना आर्थिक साक्षरता व धनसंपत्ती वृद्धीवर मार्गदर्शन; अनामप्रेमच्या अंध विद्यार्थ्याने केले प्रास्ताविक; पाहुण्यांची करून दिली ओळख

नगर – कष्टाने कमावलेल्या पैशाचे योग्य नियोजन, बचत आणि गुंतवणुकीच्या माध्यमातून आर्थिक स्वातंत्र्य तसेच सुरक्षित भविष्य साध्य करता येते. त्यासाठी प्रत्येकाने आर्थिकदृष्ट्या साक्षर होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे येथील अर्थतज्ज्ञ सुधीर भगत यांनी केले.

आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेयर्स असोसिएशन (AESA), अहिल्यानगर आणि इंटेरियर डिझायनर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'आर्थिक साक्षरता व धनसंपत्ती वृद्धी' या विषयावर टिळक रोडवरील हॉटेल राज पॅलेस येथे विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुधीर भगत यांनी उपस्थित सभासदांना आर्थिक नियोजनाच्या विविध पैलूंबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

भगत यांनी आर्थिक स्वातंत्र्य, मुलांच्या शिक्षणाचे नियोजन, सेवानिवृत्तीचे नियोजन, निष्क्रिय उत्पन्नाचे स्रोत, महागाई, भारताच्या आर्थिक विकासाची वाटचाल तसेच म्युच्युअल फंड, SIP, SWP आणि कर बचत यांसह विविध विषयांवर माहिती दिली. केवळ कमाई वाढविणे पुरेसे नसून कमाईसोबत खर्च, बचत आणि गुंतवणूक यांचा योग्य समतोल साधणे आवश्यक आहे. भविष्यातील आर्थिक उद्दिष्टे निश्चित करून त्यानुसार शिस्तबद्ध पद्धतीने आर्थिक नियोजन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.




'आर्थिक साक्षरता व धनसंपत्ती वृद्धी' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमात बोलताना सुधीर भगत. (छायाचित्र : लहू दळवी)

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते अनामप्रेम संस्थेतील अंध विद्यार्थी अविनाश कोळेकर ऊर्फ 'सरपंच' याचे प्रभावी प्रास्ताविक. अविनाश कोळेकर याने आत्मविश्वासाने उपस्थितांचे स्वागत केले तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या पाहुण्यांची ओळख करून दिली. त्याच्या आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी प्रास्ताविकाचे उपस्थितांनी कौतुक केले.

सामाजिक बांधिलकी जपत अर्थतज्ज्ञ सुधीर भगत यांनी अनामप्रेम संस्थेला संगणक भेट दिला. अंध विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी तसेच त्यांच्या शैक्षणिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी या संगणकाचा उपयोग होणार आहे. भगत यांच्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

यावेळी अनामप्रेमचे अध्यक्ष अजित माने, तसेच अभय गायकवाड यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. अनामप्रेमच्या कार्याला विविध स्तरांतून मिळणाऱ्या सहकार्यामुळे अंध विद्यार्थ्यांना शिक्षण, आत्मनिर्भरता आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पुढे जाण्यास मदत होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमासाठी ऋणानुबंध परिवाराचे अजित रोकडे तसेच परिवारातील पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या सहकार्याबद्दल आयोजकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी AESAचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे, उपाध्यक्ष इंजि. सुनील औटी, सचिव इंजि. भूषण पांडव, तसेच इंटेरियर डिझायनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सागर कुंदूर, सेक्रेटरी व्रजेश शाह आणि ट्रेझरर अंकुर सुपेकर यांनी पुढाकार घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

# पद्मशाली सोशल फाउंडेशन आयोजित निबंध स्पर्धेत श्रेयस वाघ, रितविका गोंडगिरे, प्रियांका सिनारे प्रथम

नगर – पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, नेप्ती नाका, अहिल्यानगर येथे पार पडला. या स्पर्धेला तब्बल ४५० स्पर्धकांनी प्रतिसाद दिला. इयत्ता ५ वी ते ७ वी, इयत्ता ८ वी ते १० वी आणि खुला गट अशा तीन गटांमध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देऊन व फेटा बांधून गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त शिक्षिका सुरेखा आडम होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारप, महानगरपालिकेचे विषयतज्ज्ञ अरुण पालवे, शिक्षण विस्तार अधिकारी शेख राज मोहम्मद, रवी दंडी, इंजि. प्रशांत कोक्कुल, पद्मशाली सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी आदी उपस्थित होते.



पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, नेप्ती नाका, अहिल्यानगर येथे पार पडला.

स्पर्धेतील विजेत्यांची नावे अमोल गुंडू यांनी वाचून दाखविली. सूत्रसंचालन श्रीनिवास बुरगुल यांनी केले, तर आभार प्रदर्शन इंजि.अक्षय बल्लाळ यांनी केले.

विजेते स्पर्धक – इयत्ता ५ वी ते ७ वी : प्रथम – श्रेयस प्रदीप वाघ, (रेसिडेन्सिअल हायस्कूल), द्वितीय – शुभ्रा उदय तरवडे (श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी), तृतीय – इशिका राहुल चिलका (कै. वि.ल. कुलकर्णी शाळा), उत्तेजनार्थ– श्रेया वैभव तांदळे (श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी) व अनुष्का गोरख संभार (श्री मार्कंडेय विद्यालय), हस्ताक्षर – श्रेयस प्रदीप वाघ (रेसिडेन्सिअल हायस्कूल).

इयत्ता ८ वी ते १० वी : प्रथम – रितविका भाऊसाहेब गोंडगिरे (श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी), द्वितीय – देविका महेश साळुंके (रेसिडेन्सिअल हायस्कूल), तृतीय – वैभवी योगेश गोडळकर (श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी) उत्तेजनार्थ – सिद्धांत माऊली कुसाळकर (रेसिडेन्सिअल हायस्कूल) व लावण्या किरण साठे (रेसिडेन्सिअल हायस्कूल) हस्ताक्षर – अनुष्का चंद्रकांत फसले (रेसिडेन्सिअल हायस्कूल)

खुला गट : प्रथम – प्रियांका सचिन सिनारे, द्वितीय – साईगीता गणेश सब्बन, तृतीय – शिल्पा अरुण दहातोंडे, उत्तेजनार्थ – अक्षदा दत्तात्रय वडवणीकर व नेहा वधवा.

कार्यक्रमाच्यायशस्वीतेसाठी गणेश लकशेट्टी, अजय लयचेट्टी, श्रीनिवास बुरगुल, अमोल गुंडू, राजेंद्र बुलबुले, अक्षय बल्लाळ, मयूर जिंदम, अमित सुंकी, शंकर जिंदम, वरद लकशेट्टी, शुभम सुंकी, प्रतिक उकिर्डे आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमासाठी रोहित अलवाल, निलेश अलवाल, ओंकार यन्नम, गायत्री यन्नम, भूषण येनगुल, चंद्रकांत बेती, सागर गाजेंगी, प्रशांत कोक्कुल, दत्तात्रय जोग, कृष्णा पेंडम, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेता नारायण मंगलारप, पियुष गांगर्डे, अमोल गाजेंगी, श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट, महेंद्र लकशेटी, दत्ता लकशेटी, वरद अन्नलदास, ऋषिकेश दसकन आदींनी सहकार्य केले.



इंग्लंडचा ट्रायम मोटरसायकल शोरूमचा शुभारंभ झाला. (छायाचित्र : लहू दळवी)

# अहिल्यानगर शहरामध्ये इंग्लंड येथील ट्रायम मोटरसायकल शोरूमचा शुभारंभ

नगर – मनमाड रोड, सावेडी नाका येथे इंग्लंडचा ट्रायम मोटरसायकल ब्रँड अहिल्यानगर शहरात दाखल झाला असून, शोरूमचा शुभारंभ झाला. उद्घाटन संचालक दिनेश बतरा व बिना बतरा यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते दोन मोटरसायकलींचे ग्राहकांना वितरण करण्यात आले. या शुभारंभप्रसंगी दैनिक नवा मराठाचे संपादक सुभाष गुंदेचा, हर्ष बतरा, महेश अण्णा, जतिन राजपाल, डॉ. अभिषेक वाही, सुभाष झुले, मयूर कुलथे, जुनेद मुर्तुजा, चिन्मय जगताप, शंतनू सातपुते, नगरसेवक मोहित पंजाबी, सर्कल हेड रिशब राज, जॉनीस जॉर्ज, कृष्णा अहुजा, रोहन मांडे, डॉ. पियुष पाटील यांच्यासह ग्राहक उपस्थित होते.

संचालक हर्ष बतरा यांनी सांगितले की, इंग्लंड येथील ट्रायम मोटरसायकलचे उत्पादन चाकण, पुणे येथील बजाज ऑटो लिमिटेड येथे केले जाते. कंपनीकडून२५० सीसी ते २५०० सीसी पर्यंतच्या मोटरसायकलींची निर्मिती केली जाते. या मोटरसायकलींना दहा वर्षांची वॉरंटी असल्याचे त्यांनी सांगितले.

ट्रायम मोटरसायकली विक्रीसाठी कामदा ऑटो रायडर्स शोरूममध्ये उपलब्ध झाल्या असून, ग्राहकांना विविध मॉडेल्सचा पर्याय मिळणार आहे. यामध्ये स्पीड टी४, स्पीड ४००, ट्रेकर ४००, स्क्रॅम्बलर ४०० एक्ससी, ट्रक्सटन ४०० आदी मोटरसायकलींचा समावेश आहे.



मनपा शाळा नंबर ४ रेल्वे स्टेशन येथे विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

# रेल्वे स्टेशन येथील मनपा शाळेत स्कूल बॅगचे वाटप

नगर – रेल्वे स्टेशन परिसरातील मनपा शाळा नंबर ४ रेल्वे स्टेशन येथे विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी स्वाभिमानी संघाचे जिल्हाध्यक्ष सचिन उबाळे, रेलवे स्टेशन प्रभागातील नगरसेवक दत्ता गाडळकर, मयूर बांगरे, जालिंदर कोतकर, मनोज कोतकर उपस्थित होते. संकेत गव्हाळे, संभाजी पवार, दीपक लोंढे, शरद दळवी, रोहन शेळके, संतोष मदनार, आकाश निर्भवणे, अनिल झिरपे, संदेश इंगळे, आदित्य शिदोरे, विलास भिंगारदिवे, प्रशांत हाथरूनकर, मयूर थोरात इत्यादी उपस्थित होते. तसेच पालक वर्गही उपस्थित होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विजय घिगे यांनी तर सूत्रसंचालन विठ्ठल आठरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. मनीषा शिंदे, भारती कवडे, मनीषा गिरमकर, दिपाली नवले, अमोल बोठे, भारती परदेशी, दीप्ती दरेकर, ज्योती बोलके आदींनी योगदान दिले.

# डॉन बॉस्को विद्यालयात 'कॅन्टीन डे' द्वारे विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव

नगर – डॉन बॉस्को विद्यालयात 'कॅन्टीन डे' उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन विशेष प्रार्थना करून व रंगीबेरंगी फुगे आकाशात सोडून करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक फादर अजित मुनीस आणि व्यवस्थापक फादर बेस्टीन प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमात इयत्ता पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी विविध चवदार खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स लावले होते. यामध्ये पावभाजी, वडापाव, समोसा, भजी, पुरणपोळी, पाणीपुरी, मंचुरियन, नूडल्स, फ्रेंच फ्राईज, इडली–चटणी, मसाला डोसा, वेफर्स, मसाला सोडा तसेच विद्यार्थ्यांच्या विशेष पसंतीचे आईस्क्रीम आणि बर्फाचा गोळा अशा विविध पदार्थांचा समावेश होता. सर्वच स्टॉल्सवर विद्यार्थ्यांनी गर्दी करत पदार्थांची चव चाखली.



डॉन बॉस्को विद्यालयात 'कॅन्टीन डे' उत्साहात साजरा करण्यात आला.

विशेष म्हणजे पालक प्रतिनिधी यांनी देखील खाद्य पदार्थाचा स्टॉल लावून सहभाग नोंदविला.

खाद्यपदार्थांसोबतच विद्यार्थ्यांसाठी मनोरंजक खेळांचेही आयोजन करण्यात आले होते. रिंग गेम, बंदुकीने फुगे फोडणे, नेमबाजी यांसारख्या अनेक खेळांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आकर्षक बक्षिसे जिंकली.

विद्यार्थ्यांमध्ये कामाचे नियोजन, स्वयंरोजगाराची प्रेरणा, व्यावहारिक ज्ञान आणि संघभावना निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी यासाठी 'कॅन्टीन डे'मधून मिळणाऱ्या नफ्यातून विद्यालयातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली जाणार आहे.

मुख्याध्यापक फादर अजित मुनीस यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शितल कोतकर, नितीन गायकवाड, सोनिया पाटोळे, सुहासिनी देठे आणि हनी अनदानी यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. यासाठी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शिल्पा निकाळजे व विद्यालयाचे समन्वयक फ्रान्सिस पाटोळे यांचे सहकार्य लाभले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांचे सहकार्य लाभले.

# लक्ष्मीनारायण पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळमेळीत

## संस्थेच्या प्रगतीवर सभासदांचा विश्वास; 'सहकार समृद्ध पुरस्कारा'बद्दल संचालक मंडळाचे अभिनंदन

नगर – लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या., अहिल्यानगरची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सावेड़ी येथील हॉटेल श्रद्धा येथे अध्यक्षा सौ. मिनल ईश्वर बोरा यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण व खेळमेळीच्या वातावरणात झाली. यावेळी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत असताना सभासदांनी समाधान व्यक्त करून संस्थेच्या भावी वाटचालीबाबत विश्वास व्यक्त केला.

वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी संस्थेच्या वतीने सभासद प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र सहकार कायद्यातील विविध तरतुदी, नियम व बारकावे तसेच सभासदांची कर्तव्ये आणि संस्थेबद्दलची जबाबदारी याबाबत श्री. साखरे यांनी सभासदांना मार्गदर्शन केले.

सभेस संस्थेच्या व्हाईस चेअरमन सौ. स्वाती महेश गुंदेचा, कार्यकारी संचालक नरेंद्र बागडे, संचालक गणेश मानकर, विजय जुंदरे, डॉ. दिलीप बागल, प्रतीक बोगावत, सुनील पावले, उमेश कोदे, तज्ञ संचालक ॲड. अभिजीत कोठारी, व्यवस्थापक संतोष वल्ली, सहव्यवस्थापक श्रीमती छाया साळी, तसेच वैष्णवी टोकसिया, सौरभ मानकर आदींसह सभासद उपस्थित होते.

यावेळी नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबुशेठ) बोरा, विजय गुगळे, संजय सागांवकर, कृष्णा बागडे, सचिन चोपडा, दीपक खंडेलवाल, आदित्य गांधी, संभव काठेड, अनंत कनोरे, नरेंद्र कांबळे, जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक विनीत अजित बोरा, विशाल तांबोळी, महावीर गुगळे, सुशील ओस्तवाल, आनंद भंडारी, हितेश गुप्ता, संजय बोगावत, वरुण चोपडा, राहुल झंवर, गोपाल मालू, विजय आहेर, सौरभ भांडेकर, प्रवीण कोठारी, सुनील काळे, अनिकेत मुनोत, सुनील कटारिया, प्रशांत भंडारी, प्रमोद गांधी, प्रशांत मुथा, पीयूष मुथा, किशोर मुथा, सौ. सुरेखा अशोक शेकटकर, सौ. भारती ओस्तवाल, अजिता एडके, सौ. निकिता भंडारी, सौ. नीता झंवर, सौ. नीतिका गुप्ता, सौ. शिल्पा मुथा, सौ. किरण मुथा, सौ. सपना तांबोळी आदींसह सभासद उपस्थित होते.

सभेत करताना नरेंद्र बागडे यांनी संस्थेच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेतला. आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये संस्थेच्या एकूण ठेवी रु. १२ कोटी ५९ लाख इतक्या असून संस्थेने सुमारे एकूण रु. ४८ कोटींचा व्यवसाय केला आहे. संस्थेच्या ठेवींमध्ये १३.७७ टक्के, तर कर्जामध्ये १६.७१ टक्के वाढ झाली आहे. परिणामी संस्थेला सीडी रेशो





लक्ष्मीनारायण सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती देताना अध्यक्षा सौ. मिनल बोरा.

८० टक्क्यांच्या आत राखण्यात यश आले आहे. आजमितीस संस्थेकडे रु. १५ कोटी ६७ लाखांच्या ठेवी, तर एकूण कर्ज वितरण रु. १४ कोटी ७१ लाख इतके आहे. संस्थेचे राखीव व इतर निधी रु. ३९ लाख ४५ हजार, तर वसूल भागभांडवल रु. ४५ लाख आहे. संस्थेने विविध बँकांमध्ये एकूण रु. २ कोटी ७६ लाखांची गुंतवणूक केली आहे. यावर्षी संस्थेला रु. २ लाख ८९ हजार २५२ इतका नफा झाला असून संस्थेने याही वर्षी सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर केला आहे.

संस्थेच्या कामगिरीचा विशेष गौरव करणारा क्षण म्हणजे संस्थेला नुकताच प्राप्त झालेला 'सहकार समृद्ध पुरस्कार' होय. सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी, पारदर्शक व विश्वासार्ह कारभार, सामाजिक बांधीलकी आणि संस्थेची सातत्यपूर्ण प्रगती यांची दखल घेत नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि., अहिल्यानगर यांच्या वतीने हा पुरस्कार संस्थेला प्रदान करण्यात आला. संस्थेने हे पुरस्कार प्राप्त केल्याकारणाने संस्थेच्या सर्व संचालकांच्या वतीने व्यवस्थापक संतोष वल्ली व सहव्यवस्थापक छाया साळी यांचे सभेत चेअरमन यांच्या हस्ते सन्मान करण्यात आले. या कामगिरीबद्दल संस्थेच्या कर्मचारी व सभासदांच्या वतीने संपूर्ण संचालक मंडळाचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात संस्थेच्या अध्यक्षा सौ. मिनल बोरा यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी अशोक (बाबुशेठ) बोरा यांनीही मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या कठीण काळाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, संस्थेची थकबाकी व NPA जवळपास ७५ ते ८० टक्क्यांपर्यंत पोहोचलेली असतानाही सौ. मिनल व ईश्वर बोरा यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा, कायदेशीर मार्गाचा अवलंब आणि वसुलीवर विशेष भर देत संस्थेची थकबाकी मोठ्या प्रमाणावर वसूल केली. परिणामी संस्थेची NPA आज २० टक्क्यांच्या आत आणण्यात यश आले असल्याचे त्यांनी नमूद केले. याचबरोबर संस्थेची स्वतःची स्वमालकीची जागा असावी यासाठी बोरा दाम्पत्य प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. ईश्वर बोरा हे जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन असताना त्यांच्या कार्यकाळात संस्थेच्या स्वमालकीच्या जागेसाठी प्रयत्न करून ते स्वप्न पूर्ण करण्यात आले होते. त्याच धर्तीवर लक्ष्मीनारायण पतसंस्थेचेही स्वमालकीच्या जागेचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सभेत संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन कार्यकारी संचालक नरेंद्र बागडे यांनी केले. सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना सौ. मिनल बोरा तसेच नरेंद्र बागडे यांनी सविस्तर व समाधानकारक उत्तरे दिली. विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना सभासदांनी एकमताने व एकमुखाने मंजुरी दिली.

सूत्रसंचालन व्यवस्थापक संतोष वल्ली यांनी केले. सौ. स्वाती गुंदेचा यांनी संचालक, सभासद व कर्मचारी यांचे आभार मानले. संस्थेच्या वतीने उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली.



अहिल्यानगर जिल्हास्तरीय जैन संमेलन (मंथन शिबीर) साठी जिल्हा परिषदेचे सीईओ आनंद भंडारी यांना जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनच्या वतीने निमंत्रण देताना संजय गुगळे, कमलेश गुंदेचा, ताराचंद डुंगरवाल, प्रमोद सोलंकी, अनिल गांधी, प्रणित मुथा, संकेत गुगळे, अशोक बलदोटा, राजेंद्र बलदोटा, भरत सुपेकर आदी.

# अहिल्यानगर मधील जिल्हास्तरीय जैन संमेलनासाठी जिल्हा परिषदेचे सीईओ आनंद भंडारी यांना निमंत्रण

नगर – महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषीजी म.सा. तथा अर्हम् विज्ञा प्रणेता उपाध्याय श्री प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाखाली समर्पण चातुर्मास समिती व अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनच्या वतीने ४ ऑक्टोबर २०२६ रोजी आनंदतीर्थ समवशरण, एन.एन. संस्था कॉलेज समोर, आनंदधाम जवळ, अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय जैन संमेलनाचे (मंथन शिबीर) आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनच्या वतीने निमंत्रण देण्यात आले.

यावेळी संजय गुगळे, कमलेश गुंदेचा, ताराचंद डुंगरवाल, प्रमोद सोलंकी, अनिल गांधी, प्रणित मुथा, संकेत गुगळे, अशोक बलदोटा, राजेंद्र बलदोटा, भरत सुपेकर आदी केमिस्ट बांधव उपस्थित होते.

# लायन्स क्लबच्या सेवाभावी उपक्रमांनी गांधी जयंती साजरी

## सेवा सप्ताहास प्रारंभ

नगर – राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करून सेवा सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. वाडियापार्क क्रीडा संकुल येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सेवा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माळीवाडा येथील महात्मा फुले छात्रालयातील विद्यार्थ्यांसाठी फॅनची भेट देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी सकाळी चहा व नाश्त्याचीही व्यवस्था करण्यात आली.




राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करून सेवा सप्ताहास प्रारंभ करण्यात आला.

क्लबच्या माध्यमातून समाजातील गरजू व वंचित घटकांना मदतीचा हात देत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गांधी जयंतीनिमित्त सेवा सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले छात्रालयास सुमित लोढा यांच्या वतीने फॅन देण्यात आला. यावेळी क्लबचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरिष हरवाणी, खजिनदार विजय कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख किरण भंडारी, धनंजय भंडारे, सुमित लोढा, सुनील छाजेड, प्रशांत मुनोत, डॉ. सिमरन वधवा, पूर्णाक्षी शाह, सुरेश खामकर, तसेच महात्मा फुले वसतिगृहाचे गणेश कोरडे यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

हरजितसिंह वधवा यांनी सांगितले की, लायन्स इंटरनॅशनलच्या प्रणालीप्रमाणे २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान जगभरात सेवा सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. गांधीजींनी समाजसेवा, स्वच्छता आणि सर्वसमावेशकतेचा दिलेला संदेश लक्षात घेऊन सेवाभावी उपक्रमांना चालना देण्याचा लायन्स क्लबचा प्रयत्न आहे. यावर्षी दुष्काळग्रस्त गावांसाठी विविध उपक्रम राबविणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

हरिष हरवानी यांनी सांगितले की, सेवा सप्ताहाच्या माध्यमातून यंदा आरोग्यविषयक उपक्रमांवर विशेष भर देण्याचा क्लबचा मानस आहे. त्यांच्यासाठीही विविध प्रकल्प राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. समाजाच्या गरजेनुसार सेवाकार्याचे स्वरूप ठरवून अधिकाधिक नागरिकांना त्याचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अहिल्यानगर शहरात रंगले उर्दू काव्यसंमेलन; नव्या पिढीला साहित्याशी जोडण्याचा संकल्प

नगर – संस्था अदब–ए–इस्लामी, अहमदनगर शाखेच्या वतीने शहरातील हातमपुरा येथील जमाअत–ए–इस्लामी हिंदच्या कार्यालयात उर्दू काव्यसंमेलन पार पडले. या साहित्यिक मैफलीत शहरातील उर्दू शायरांनी आपला निवडक काव्यसंग्रह सादर केला. रसिकांनी शायरांच्या काव्याला दाद देत कार्यक्रमाचा आनंद घेतला. या काव्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक व कवी प्रा. नदीम बीजापुरी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्था अदब–ए–इस्लामीचे नाझिम–ए–अदबियात, तखलीक व तहकीक जनाब मुनव्वर हुसेन यांनी शायरीने करुन उपस्थितांचे लक्ष वेधले.



संस्था अदब–ए–इस्लामी, अहमदनगर शाखेच्या वतीने शहरातील हातमपुरा येथील जमाअत–ए–इस्लामी हिंदच्या कार्यालयात उर्दू काव्यसंमेलन पार पडले.

कार्यक्रमात प्रा. नदीम बीजापुरी, आसिफ अहमद आसिफ, बिलाल अहमदनगरी, मकबूल अहमदनगरी, मुश्ताक अहमद मुश्ताक सर आणि मुनव्वर हुसेन अहमदनगरी यांनी काव्य सादर केले. त्यांच्या काव्यात समकालीन जाणीव, नैतिक मूल्ये, सामाजिक भान तसेच उर्दू भाषा व साहित्याची समृद्धता आणि सौंदर्य प्रकर्षाने जाणवले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी संस्था अदब–ए–इस्लामीचे नाझिम–ए–अदबियात, तखलीक व तहकीक जनाब मुनव्वर हुसेन छोटे खान यांनी संस्थेच्या आगामी साहित्यिक उपक्रमांची माहिती दिली. यावेळी त्यांनी घोषणा केली की, यावर्षी नव्या पिढीला उर्दू साहित्याशी जोडणे हे संस्था अदब–ए–इस्लामीच्या प्रमुख प्राधान्यक्रमांपैकी एक राहणार असून, यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे.

नव्या पिढीमध्ये उर्दू भाषा व साहित्याबद्दल आवड निर्माण करण्यासाठी शहरातील विविध भागांमध्ये आणि वस्त्यांमध्ये जाऊन साहित्यिक मैफली, काव्यसंमेलने तसेच विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या माध्यमातून उर्दू साहित्याच्या प्रसाराचे कार्य समाजातील व्यापक घटकांपर्यंत, विशेषतः तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उर्दू भाषा व साहित्याच्या संवर्धनासाठी संस्था अदब–ए–इस्लामीच्या वतीने भविष्यातही विविध साहित्यिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत शंभूराजे कुस्ती संकुल मध्ये सराव करणाऱ्या मल्लांनी कामगिरी करत यश प्राप्त केले.

# शंभूराजे कुस्ती संकुलच्या पैलवानांचे घवघवीत यश

भेंडे – अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा वाडिया पार्क येथे घेण्यात आल्या. स्पर्धेत शंभूराजे कुस्ती संकुल मध्ये सराव करणाऱ्या मल्लांनी कामगिरी करत विविध वजनगटात यश प्राप्त केले.

१४ वर्षे मुले गटात – ३८ किलो – उस्मान शेख (प्रथम), ४१ किलो – संस्कार शेंदुरकर (प्रथम), ४४ किलो – श्रेयस उगले (प्रथम), ४८ किलो – ध्रुव ठाकूर (प्रथम), ३८ किलो – रुद्र राक्षे (द्वितीय), ५२ किलो – श्रेयस काळे (द्वितीय).

१७ वर्षे मुले गटात – ७१ किलो – उदय गायकवाड (प्रथम), ९२ किलो – कृष्णा शेटे (प्रथम), ५२ किलो – विराज भोसले (द्वितीय)

१९ वर्षे मुले गटात – ६० किलो – ताकी खान ७ (प्रथम), ८२ किलो – शौर्य मदने (प्रथम).

मुलींचा गट – १४ वर्षे – ४० किलो – राजेश्वरी म्हस्के(प्रथम), ६२ किलो – सिद्धी गायकवाड (प्रथम)

१७ वर्षे – ५६ किलो – सेजल लाटे (प्रथम), ६५ किलो – गायत्री खामकर (प्रथम).

प्रथम क्रमांक पटकावलेल्या खेळाडूंची पुणे विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी खेळाडूंना कुस्ती प्रशिक्षक पै. शिवाजी चव्हाण, पै.युवराज चव्हाण, पै.संदीप गायकवाड, पै.राजेंद्र कंम्बोज यांचे मार्गदर्शन लाभले.

# अहिल्यानगरात 'भटके–विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान' ला प्रतिसाद

## जात प्रमाणपत्रासह आधार, मतदार ओळखपत्र विविध दाखल्यांची झाली सोय; कागदपत्रांच्या अभावामुळे योजनांपासून वंचित राहू नये

नगर – श्री बालाजी श्रमजीवी संस्था (ट्रस्ट) आणि भटके व विमुक्त विकास परिषद यांच्या वतीने अहिल्यानगर शहरात तीन दिवसीय 'भटके–विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान' राबविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियानांतर्गत राज्यभर विशेष उपक्रम राबविण्यात येत असून, त्याच पार्श्वभूमीवर या विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

मंगलगेट येथील काशीकापडी समाज मंदिर, जे. जे. गल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या या अभियानाला भटके–विमुक्त समाजातील नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. या तीन दिवसीय अभियानात सुमारे १२० नागरिकांना जात प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, आधार कार्ड दुरुस्ती, निवडणूक ओळखपत्र तसेच मतदार नोंदणी यांसह विविध शासकीय कागदपत्रे व योजनांसंदर्भात आवश्यक मार्गदर्शन आणि मदत करण्यात आली.




मंगलगेट येथील काशीकापडी समाज मंदिर, जे. जे. गल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या या अभियानाला भटके–विमुक्त समाजातील नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

या अभियानाचे आयोजन श्री बालाजी श्रमजीवी संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ वाडेकर आणि जिल्हा अशासकीय समिती सदस्य मुकेश चखाले यांच्या पुढाकाराने करण्यात आले. अभियानाचे उद्घाटन भाजपा भटक्या–विमुक्त आघाडीचे तुषार पोटे यांच्या हस्ते झाले. यावेळी गाडगे महाराज आश्रमशाळा, टाकळी काझीचे मुख्याध्यापक अशोक सुरोशी, आश्रमशाळेचे राजू हारदे, अहिल्यानगर जिल्हा काशी कापडी समाजाचे अध्यक्ष रमेश भिंगारे, सोमनाथ वराट, अर्जुन चव्हाण, अनिल निकम आदी उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविक करताना राजाभाऊ वाडेकर म्हणाले की, भटके–विमुक्त समाजातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियानांतर्गत राज्यभर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजना व सुविधा पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याच अनुषंगाने अहिल्यानगर शहरात तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

भटक्या जीवनशैलीमुळे अनेक कुटुंबांकडे आवश्यक शासकीय कागदपत्रे, दाखले आणि ओळखपत्रे उपलब्ध नसतात. परिणामी, शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, शैक्षणिक सवलती, आरक्षण तसेच इतर सुविधांचा लाभ घेताना या समाजातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अनेक वेळा केवळ आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे पात्र असूनही नागरिक शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. ही बाब लक्षात घेऊन भटके–विमुक्त समाजातील नागरिकांना त्यांच्या वस्त्यांमध्येच आवश्यक कागदपत्रांसाठी मार्गदर्शन आणि प्रक्रिया उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विशेष अभियान राबविण्यात आले. नागरिकांना विविध कार्यालयांमध्ये वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, तसेच कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक माहिती एकाच ठिकाणी मिळावी, यासाठी या शिबिराचा उपयोग झाला.

या विशेष अभियानात आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, शिधापत्रिका (रेशन कार्ड), नॉन–क्रिमीलेअर प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, आयुष्मान भारत कार्ड, विवाह नोंदणी आणि दिव्यांग प्रमाणपत्र आदी आवश्यक कागदपत्रे व सुविधांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. पात्र नागरिकांच्या विविध शासकीय कामांसाठी आवश्यक प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. विशेषतः जात प्रमाणपत्रासारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांअभावी शिक्षण, नोकरी, आरक्षण आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अशा कागदपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या अभियानामुळे समाजातील नागरिकांना मोठा आधार मिळाला.

भटके–विमुक्त समाजातील नागरिकांना शासकीय योजनांची माहिती मिळणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होणे आणि त्यांना उपलब्ध असलेल्या विविध सुविधांचा लाभ घेता येणे, यासाठी अशा विशेष अभियानांची आवश्यकता असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. शासनाच्या योजनांचा लाभ केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी समाजातील कार्यकर्ते, संस्था आणि प्रशासन यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश भिंगारे यांनी केले, तर मुकेश चखाले यांनी आभार मानले. अभियान यशस्वी करण्यासाठी अनिल भिंगारे, नितीन गंगेकर, अक्षय भिंगारे, सागर वाडेकर, निलेश वाडेकर, रवी अकोलकर, मयूर वाडेकर, माजी नगरसेवक राजू गंगेकर, प्रमोद भिंगारे, राजू भिंगारे, विजय निंबाळकर, गणेश गंगेकर यांनी परिश्रम घेतले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता





## उंच झाडांवर घरे बांधून राहणारा समुदाय

आधुनिक तंत्रज्ञान आणि धावपळीच्या जगापासून हजारो मैल दूर, इंडोनेशियाच्या पापुआ प्रांतातील घनदाट जंगलात एक असा आदिवासी समुदाय राहतो, ज्यांचे जीवन आजही हजारो वर्षांपूर्वीसारखेच आहे. हा आहे 'कोरोवाई' समुदाय. जमिनीवर न राहता चक्क १० ते ५० मीटर उंचीवर झाडांवर घरे बांधून राहण्याची त्यांची पद्धत संपूर्ण जगासाठी कुतूहलाचा विषय ठरली आहे. कोरोवाई किंवा 'कोलुफो' जमातीची लोकसंख्या जेमतेम ४,००० ते ४,४०० इतकी आहे. त्यांच्या जीवनशैलीची काही **खास वैशिष्ट्ये : झाडांवरील घरे :** जंगली श्वापदे आणि शत्रू टोळ्यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी हे लोक उंच झाडांच्या फांद्यांवर आपली घरे बांधतात. **दैनंदिन जीवन :** झाडांवर चढणे, तिथेच स्वयंपाक करणे आणि झोपणे ही त्यांच्यासाठी सामान्य गोष्ट आहे. **अन्न :** शिकार करणे, मासेमारी आणि जंगलातील कंदमुळे, फळे गोळा करून ते आपली उपजीविका करतात. १९७० च्या दशकापर्यंत या जमातीबद्दल बाह्य जगाला काहीही माहिती नव्हती. वीज, रस्ते किंवा बाजारपेठ यांपैकी कशाचाही त्यांच्या आयुष्यात शिरकाव झाला नव्हता. काही संशोधकांच्या मते, ५५,००० वर्षांहून अधिक काळ ही जमात जगापासून तुटलेली होती आणि त्यांना वाटायचे की पृथ्वीवर ते एकमेव मानव आहेत. अलीकडच्या वर्षांत काही पर्यटक, मिशनरी आणि संशोधक त्यांच्यापर्यंत पोहोचले आहेत.

## धूमकेतूचा शोध एडमंड हॅले यांच्या आधीच लागला?

अंतराळ विज्ञानाच्या इतिहासात 'हॅलेचा धूमकेतू' हा अत्यंत प्रसिद्ध आहे. आजवर या धूमकेतूच्या परिभ्रमणाचा शोध लावण्याचे श्रेय ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ एडमंड हॅले यांना दिले जात होते. मात्र, एका नवीन संशोधनानुसार, एडमंड हॅले यांच्या ६०० वर्षांपूर्वीच एका इंग्रज साधूने (मंक) या धूमकेतूचा आवर्ती काळ (पिरिऑडिक ऑर्बिट) ओळखला असावा, असा दावा करण्यात आला आहे.

मालमेसबरी येथील एयल्मर (ज्यांना एथेलमेर म्हणूनही ओळखले जाते) नावाच्या एका इंग्रज साधूने सन १०६६ मध्येच या धूमकेतूचा संबंध ९८९ मधील निरीक्षणाशी जोडला होता. एयल्मर हे त्यांच्या विमान उड्डाणाच्या धाडसी प्रयोगासाठी ओळखले जातात. ग्रीक दंतकथांनुसार 'डेडलस'च्या कथेने प्रेरित होऊन त्यांनी स्वतः पंख तयार करून एका टॉवरवरून उडी मारली होती, ज्यात त्यांचे दोन्ही पाय मोडले होते. विमान उड्डाणासोबतच त्यांना ज्योतिष आणि खगोलशास्त्रातही रस होता. नेदरलँडस्मधील लायडेन विद्यापीठाचे खगोलशास्त्रज्ञ सायमन पोर्टेगीज इवार्ट यांच्या मते, एयल्मर यांनी लहानपणी ९८९ मध्ये हा धूमकेतू पाहिला होता आणि त्यानंतर १०६६ मध्ये जेव्हा तो पुन्हा दिसला, तेव्हा त्यांनी या दोन्ही घटनांमधील दुवा ओळखला होता.

१२ व्या शतकातील इतिहासकार विल्यम ऑफ मालमेसबरी यांच्या नोंदीनुसार, १०६६ मध्ये धूमकेतू पाहून एयल्मर उद्गारले होते की : 'तू आलास तर... तुला पाहून बराच काळ लोटला आहे; पण आता तू अधिक भयानक दिसत आहेस, कारण तू माझ्या मातृभूमीचा नाश घेऊन येत आहेस.' त्यावेळी इंग्लंडमध्ये राजा एडवर्ड द कन्फेसर यांच्या निधनानंतर उत्तराधिकाराचे संकट निर्माण झाले होते. जर या नोंदी अचूक असतील, तर एडमंड हॅले यांनी १७०५ मध्ये केलेल्या दाव्याच्या कित्येक शतके आधीच एयल्मर यांना या धूमकेतूच्या पुनरागमनाची जाणीव झाली होती. जरी या धूमकेतूला एडमंड हॅले यांचे नाव दिले गेले असले तरी, मानवी इतिहासात अनेक संस्कृतींनी आणि जिज्ञासू व्यक्तींनी या 'चमकणाऱ्या ताऱ्याचा' मागोवा घेतला होता. एयल्मर यांचे हे निरीक्षण खगोलशास्त्राच्या इतिहासाला नवी कलाटणी देणारे ठरू शकते.

### हॅलेच्या धूमकेतूचा इतिहास

**परिभ्रमण काळ :** हा धूमकेतू दर ७२ ते ८० वर्षांनी पृथ्वीवरून दिसतो. **पहिली नोंद :** याची पहिली संभाव्य नोंद इसवी सन पूर्व २३९ मध्ये चिनी कागदपत्रांमध्ये आढळते. **ऐतिहासिक महत्त्व :** १०६६ मध्ये विल्यम द कॉन्करर यांनी जेव्हा इंग्लंडवर आक्रमण केले, तेव्हाही हा धूमकेतू दिसला होता, ज्याची नोंद प्रसिद्ध 'बायू टॅपेस्ट्री'वर करण्यात आली आहे.

## दुबईत बनणार 'सोन्याचा रस्ता'

एकीकडे सोन्याच्या किमती नवनवे विक्रम प्रस्थापित करत असतानाच, दुबईने जगाला थक्क करणारी एक घोषणा केली आहे. 'इन्फ्लुएंसर हॉटस्पॉट' आणि आलिशान वास्तूंचे शहर असलेल्या दुबईत आता जगातील पहिला 'सोन्याचा रस्ता' तयार होणार आहे. 'द गोल्ड डिस्ट्रिक्ट' या मोठ्या प्रकल्पाचा हा एक भाग असणार आहे. दुबईची ज्वेलरी इंडस्ट्री अधिक सक्षम करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी या खास क्षेत्राचा विकास केला जात आहे. येथे सोने, दागिने, अत्तरे, सौंदर्य प्रसाधने आणि जीवनशैलीशी संबंधित १००० हून अधिक किरकोळ दुकाने असतील. प्रसिद्ध ज्वेलरी ब्रँड 'जॉयलुक्कास' या ठिकाणी २४,००० स्क्वेअर फूटचे आपले सर्वात मोठे फ्लॅगशिप स्टोअर सुरू करणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारी आणि ग्राहकांसाठी येथे ६ हॉटेल्समध्ये १,००० हून अधिक खोल्यांची सोय केली जाईल. सोन्याचा अनोखा रस्ता दुबईतील प्रसिद्ध डेरा परिसरात विकसित केला जाणार आहे. 'इथरा दुबई' या प्रॉपर्टी डेव्हलपरने 'दुबई गोल्ड डिस्ट्रिक्ट'च्या अधिकृत लाँचिंग वेळी ही घोषणा केली. या प्रकल्पात भारतातील आघाडीचे ज्वेलरी रिटेलर्सही सहभागी होणार आहेत. दुबई फेस्टिव्हल्स अँड रिटेल एस्टॅब्लिशमेंटचे सीईओ अहमद अल खाजा यांनी सांगितले की, 'सोने हे दुबईच्या सांस्कृतिक आणि व्यावसायिक ओळखीचे अविभाज्य भाग आहे. या खास ठिकाणाद्वारे आम्ही केवळ आमच्या वारशाचा उत्सव साजरा करणार नाही, तर सर्जनशीलता आणि शाश्वत विकासाच्या नव्या युगाची सुरुवात करू.' 'दुबई गोल्ड डिस्ट्रिक्ट आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्यात आणि गुंतवणुकीला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, ज्यामुळे राहण्यासाठी आणि काम करण्यासाठी दुबई जगातील सर्वोत्तम शहर म्हणून ओळखले जाईल,' असेही खाजा यांनी स्पष्ट केले.




## 'एआय'च्या अतिवापराने वाढतोय नैराश्याचा धोका

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) आणि आधुनिक तंत्रज्ञानाने आपले जीवन सुसह्य केले आहे. बँकिंग, शॉपिंग, ऑफिसची कामे असो किंवा शिक्षण, सर्व काही आता एका क्लिकवर किंवा व्हॉइस कमांडवर उपलब्ध आहे. आरोग्य क्षेत्रातही एआय भविष्यातील एक मोठी आशा म्हणून पाहिले जात आहे. मात्र, या चकाकीच्या मागे एक काळी बाजूदेखील आहे. आरोग्य तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की, एआय चॅटबॉटस्चा अतिवापर लोकांच्या मानसिक आरोग्यासाठी घातक ठरू शकतो.



नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणात २१,००० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये असे आढळले की, जे लोक एआय तंत्रज्ञानावर जास्त अवलंबून आहेत किंवा त्याचा अतिवापर करतात, त्यांच्यामध्ये तणाव, चिंता, चिडचिडेपणा आणि नैराश्याचा धोका इतरांपेक्षा कितीतरी जास्त आहे. 'जामा नेटवर्क' या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या या अभ्यासासाठी एप्रिल आणि मे २०२५ मध्ये माहिती गोळा करण्यात आली होती. यामध्ये १८ वर्षांवरील व्यक्तींचा समावेश होता. वापराचे प्रमाण : १०.३ टक्के लोक दररोज एआय वापरतात, तर ५.३ टक्के लोक दिवसातून अनेक तास याचा वापर करतात.

दररोज वापर करणाऱ्यांपैकी निम्मे लोक कामासाठी, ११.४ टक्के शिक्षणासाठी, तर ८७.१ टक्के लोक वैयक्तिक कारणांसाठी 'एआय' ची मदत घेतात. दररोज एआय वापरणाऱ्या लोकांमध्ये नैराश्याचा धोका इतर लोकांच्या तुलनेत ३० टक्क्यांनी जास्त असल्याचे शास्त्रज्ञांना आढळले आहे. हार्वर्ड मेडिकल स्कूलमधील मानसोपचार तज्ज्ञ रॉय एच. पर्लिस यांच्या मते, 'नैराश्यातील वाढ ही थेट 'एआय'मुळे आहे की जे लोक आधीच नैराश्यात आहेत ते मदतीसाठी 'एआय'कडे वळत आहेत, हे शोधणे कठीण आहे. मानसिक समस्या असलेले लोक आधार मिळवण्यासाठी 'एआय' चा अधिक वापर करू शकतात.

### 'एआय'च्या अतिवापराचे तोटे :

**१. बौद्धिक क्षमतेवर परिणाम :** स्वतःचे डोके न वापरता सतत 'एआय' ची मदत घेतल्याने विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता कमी होऊ शकते.

**२. सृजनशीलता कमी होणे :** दीर्घकाळ 'एआय' वर अवलंबून राहिल्याने व्यक्तीची कल्पकता आणि कार्यक्षमता मंदावते.

**३. नकारात्मक विचारांना खतपाणी :** तज्ज्ञांच्या मते, चॅटबॉटसब कधीकधी वापरकर्त्यांच्या भीती किंवा दुःखाच्या भावनांना क्लिनिकल सल्ल्याशिवाय दुजोरा देतात, ज्यामुळे नकारात्मक विचारांची मालिका अधिक गडद होऊ शकते.

**४. भ्रम आणि आत्महत्येचे विचार :** काही पुराव्यांवरून असे समोर आले आहे की, चुकीच्या पद्धतीने वापरलेले चॅटबॉटसब लोकांमध्ये गोंधळ निर्माण करू शकतात आणि टोकाच्या विचारांना चालना देऊ शकतात.

## सिनाई वाळवंटात प्राचीन 'रॉक आर्ट'चा शोध

सिनाई वाळवंटात पुरातत्त्वशास्त्रज्ञांना ५,००० वर्षे जुने एक दुर्मीळ 'रॉक आर्ट' (खडकावरील कोरीव काम) सापडले आहे. ही कलाकुसर प्राचीन इजिप्तने या प्रदेशावर मिळवलेला विजय आणि तिथल्या रहिवाशांवर केलेले क्रूर अत्याचार दर्शवते.



पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी दिलेल्या निवेदनानुसार, ही कलाकृती इजिप्शियन लोकांनी सिनाई प्रदेशावर कशा प्रकारे कब्जा मिळवला आणि स्थानिक लोकांना गुलाम बनवले, याचे भयावह चित्रण करते. खडकावर आढळलेल्या या दृश्यात : एक व्यक्ती विजयाच्या आनंदात आपले हात वर करून उभी आहे. दुसरी व्यक्ती गुडघ्यावर बसलेली असून, तिच्या छातीत बाण खुपसलेला आहे आणि हात मागे बांधलेले आहेत. जवळच एक नौका आणि 'मिन' या इजिप्शियन प्रजनन देवतेचा उल्लेख असलेला शिलालेख आहे, ज्यामध्ये त्याला 'ताम्र क्षेत्राचा शासक' म्हटले आहे.

संशोधकांच्या मते, इजिप्शियन लोकांनी सिनाईवर केवळ साम्राज्य विस्तारासाठी आक्रमण केले नव्हते, तर तिथल्या तांबे आणि फिरोजा सारख्या खनिज संपत्तीवर कब्जा मिळवणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. 'हा रॉक पॅनेल दुसऱ्या प्रदेशावर वर्चस्व गाजवल्याच्या सर्वात जुन्या चित्रणांपैकी एक आहे,' असे युनिव्हर्सिटी ऑफ बॉनचे इजिप्तॉलॉजीचे प्राध्यापक लुडविग मोरेन्झ यांनी सांगितले. या कलाकृतीमध्ये एक रंजक तपशील आढळला आहे. नौकेच्या चित्राजवळ एक शिलालेख होता, ज्यामध्ये कदाचित इजिप्शियन राजाचे नाव असावे.

मात्र, ते नाव मुद्दाम खोडून टाकण्यात आले आहे. हे नाव कोणी, कधी आणि का खोडले, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राचीन इजिप्तमध्ये सत्तांतर झाल्यावर जुन्या राजाचे नाव खोडण्याची पद्धत होती; पण येथेही तेच घडले का, याचा शोध सुरू आहे. इजिप्शियन पुरातत्त्व मंत्रालयाचे पुरातत्त्वशास्त्रज्ञ मुस्तफा नूर एल-दिन यांनी २०२५ मध्ये केलेल्या सर्वेक्षणादरम्यान हा शोध लावला. हे संशोधन 'ब्लॅटर अब्राहम्स' या नियतकालिकाच्या २०२५ च्या आवृत्तीत प्रकाशित झाले आहे.

## आशिया खंडाची निर्मिती समुद्रनाशातून

आशिया खंडाची आजची जटिल रचना ही केवळ जवळच्या भूगर्भीय धडका नाहीत, तर करोडो वर्षांपूर्वी हरवलेल्या टेथिस महासमुद्राचा परिणाम आहे. यासंदर्भातील एक नवा अभ्यास समोर आला आहे. अभ्यासानुसार टेथिस हा समुद्र हिमालयाच्या उदयापूर्वीच एशियाच्या भूभागाला आकार देत होता. ऑस्ट्रेलियातील एडिलेड विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी हे संशोधन केले आहे.




मेसोजोइक आणि सेनोजोइक काळात हा विशाल समुद्र महाद्वीपीय पट्ट्यांमध्ये पसरलेला होता. जेव्हा हा समुद्र हळूहळू नष्ट झाला तेव्हा त्याच्या भूकंपीय शक्तींनी दूरवरच्या भागात प्राचीन भंगरेषा पुन्हा जागृत केल्या आणि नव्या पर्वतरांगा उभ्या केल्या. उदाहरणार्थ आजचे कझाकिस्तान, उझबेकिस्तान आणि पश्चिम चीन हे भाग याच प्रभावाने उंचावले. पृथ्वीच्या विविध भागांतील प्रक्रिया किती जोडलेल्या आहेत, ज्यात समुद्री क्रियांचा प्रभाव हजारो किलोमीटर दूरच्या खंडांतही दिसतो. हिमालयाच्या निर्मितीपूर्वी मध्य आशिया हा पहाडी प्रदेश होता. जिथे डायनासोर फिरत असावेत. अभ्यासानुसार, क्रेटाशियस काळात हा भाग अमेरिकेच्या पश्चिम भागातील डोंगर-खोऱ्यांसारखे दिसत असावा.

आज हे प्रदेश मुख्यतः भारत आणि युरेशिया पट्ट्यांच्या टक्कराने तयार झाले आहेत; पण टेथिस समुद्रातील पट्ट्यांच्या खाली जाण्याच्या प्रक्रियेमुळे (सबडक्शन आणि रोल-बॅक) जुन्या जोडणीच्या भागात पुन्हा हालचाली झाल्या. यामुळे हिमालयाच्या टक्कर क्षेत्रापासून दूरवर समांतर पर्वतरांगा उभ्या राहिल्या. शास्त्रज्ञ सॅम बून यांच्या मते, मध्य एशियातील काही लहान काळातील पण महत्त्वाच्या पर्वत निर्मिती घटना या दूरच्या समुद्राच्या गतिविधींशी जोडल्या जाऊ शकतात. हे सिद्ध करते की, पृथ्वीच्या इतिहासात हरवलेले समुद्र आजच्या भूभागाच्या रचनेत मोठी भूमिका बजावतात. मध्य आशियाची असमतोल रचना ही हवामान बदल, मॅंटलच्या हालचाली आणि स्थानिक पट्ट्यांच्या धडकांचा परिणाम आहे, असा पूर्वी भूशास्त्रज्ञांचा विश्वास होता; पण नव्या संशोधनात याच्या विरोधाभासी मत तयार झाले आहे.

शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, गेल्या २५ कोटी वर्षांत हवामान बदल आणि मॅंटल प्रक्रियांचा प्रभाव फार मर्यादित राहिला. हे भाग दीर्घकाळ कोरडे आणि शुष्क राहिले. त्याऐवजी दूरच्या भूकंपीय बदलांनी जुन्या भूगर्भीय जोडण्या सक्रिय केल्या आणि खोरे-डोंगरांचे जाळे तयार केले. आजचा मध्य आशिया मुख्यतः पट्ट्यांच्या टक्कराने बनला; पण पूर्वीही हे भाग उंच होते. हे निष्कर्ष पृथ्वीच्या प्रणालींमध्ये दूरच्या घटनांचा किती मोठा प्रभाव असतो हे दाखवतात, असे स्टाईन ग्लोरी यांनी सांगितले.

संशोधकांनी थर्मोक्रोनोलॉजी पद्धतीचा वापर करून डोंगर उंचावणे आणि खडकांच्या क्षरण प्रक्रियेदरम्यान खडक कसे थंड होतात, याचा अभ्यास केला. याला पृथ्वीची 'उष्ण स्मृती' म्हणता येईल. मॉडेल्सद्वारे दाखवले की, खडक पृष्ठभागाकडे येताना थंड होतात. हे डेटा टेथिस समुद्राच्या विकास, प्राचीन पावसाच्या नमुन्यांसह आणि मॅंटल हालचालीच्या मॉडेल्ससोबत जोडून विश्लेषण केले. शेकडो उष्ण डेटा एकत्र करून नवे नमुने शोधले, जे वैयक्तिक अभ्यासात दिसत नव्हते.

## 'स्नो मून' गिळणार तेजस्वी ताऱ्याला



पूर्व उत्तर अमेरिकेतील आकाशप्रेमींना या आठवड्यात एक अत्यंत दुर्मीळ दृश्य पाहण्याची संधी मिळणार आहे. रविवारी, १ फेब्रुवारी रोजी पूर्ण चंद्र (स्नो मून) दिसल्यानंतर, सोमवारी (२ फेब्रुवारी) रात्री हा चंद्र सिंह राशीतील सर्वात तेजस्वी तारा 'रेग्युलस' याच्या समोरून जाणार आहे. या प्रक्रियेला खगोलशास्त्रात 'लुनार ऑक्ल्टेशन' किंवा चंद्रपिधान असे म्हणतात.

जेव्हा चंद्र पृथ्वी आणि एखाद्या ताऱ्याच्या मध्ये येतो, तेव्हा तो तारा काही काळासाठी चंद्राच्या मागे लपला जातो. सोमवारी रात्री हा तेजस्वी तारा चंद्राच्या एका बाजूने अदृश्य होईल आणि साधारण एका तासानंतर दुसऱ्या बाजूने पुन्हा प्रकट होईल. ही घटना प्रामुख्याने अमेरिका आणि कॅनडाच्या पूर्व भागातून, मध्य-पश्चिम भागापासून ते पूर्व किनारपट्टीपर्यंत साध्या डोळ्यांनी पाहता येईल. याशिवाय वायव्य आणि पश्चिम आफ्रिकेतूनही हे दृश्य दिसेल.

न्यूयॉर्क, टोरंटो आणि बोस्टन सारख्या शहरांमध्ये ही घटना रात्री ८.४० ते १०.०५ (EST) दरम्यान घडेल. उदाहरणार्थ, न्यूयॉर्कमध्ये रेग्युलस रात्री ८.५१ वाजता अदृश्य होईल आणि ९.५४ वाजता पुन्हा दिसेल. ही घटना साध्या डोळ्यांनी दिसणार असली, तरी बायनॉक्युलर्स किंवा लहान टेलिस्कोपच्या मदतीने हा अनुभव अधिक खास असेल. इंग्रेस (Ingress): जेव्हा रेग्युलस तारा चंद्राच्या तेजस्वी कडेपाशी पोहोचेल आणि चंद्राच्या मागे लुप्त होईल. इग्रेस (Egress): साधारण तासाभरानंतर तारा चंद्राच्या दुसऱ्या बाजूने बाहेर येईल, तो क्षण अधिक प्रभावी असेल. रेग्युलस ताऱ्याच्या पिधानाची ही मालिका गेल्या वर्षापासून सुरू आहे; परंतु उत्तर अमेरिकेतून सहजपणे दिसणारी ही या वर्षातील एकमेव घटना आहे. यानंतर १७ जून रोजी चंद्राद्वारे शुक्राचे पिधान होणार आहे; परंतु ते दिवसा घडणार असल्याने उत्तर अमेरिकेतून दिसणार नाही. त्यामुळे या आठवड्यातील ही रात्र खगोलप्रेमींसाठी मोठी मेजवानी ठरणार आहे.

# ‘भाई सथ्था नाईट हायस्कूल’ नगरची राष्ट्रीय पातळीवर दखल; ‘मिपा’च्या राज्यातील शंभर निवडक शाळांच्या यादीत स्थान

**‘शिक्षण अनुभूती’ फ्लिप बुकमध्ये भाई सथ्था नाईट हायस्कूलचा समावेश : डॉ. पारस कोठारी**

नगर – शहरातील हिंद सेवा मंडळ संचलित भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या रात्रशाळेच्या शैक्षणिक वाटचालीची आणि विद्यार्थीकेंद्रित नाविन्यपूर्ण उपक्रमांची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून राज्यातील विद्यार्थीहिताच्या दृष्टीने उल्लेखनीय शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या शाळांची माहिती संकलित करण्यात आली. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातून भाई सथ्था नाईट हायस्कूलचा समावेश करण्यात आला आहे.

या यशोगाथेचा समावेश राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (निपा), नवी दिल्ली यांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या ‘शिक्षण अनुभूती’ या फ्लिप बुकमध्ये करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या निवडक १०० शाळांच्या यशोगाथांचा या उपक्रमात समावेश करण्यात आला असून, त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील भाई सथ्था नाईट हायस्कूलला स्थान मिळाले आहे.

राज्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास, कौशल्यविकास आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती संकलित करण्यात आली होती. या प्रक्रियेत निवडक शाळांच्या प्रभावी उपक्रमांची आणि त्यांच्या यशस्वी वाटचालीची माहिती ‘शिक्षण अनुभूती’ या फ्लिप बुकच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातून या निवडक यशोगाथांमध्ये भाई सथ्था नाईट हायस्कूलचा समावेश करण्यात आला असून, जिल्ह्यातून समाविष्ट झालेली राज्यातील ही एकमेव रात्रशाळा असल्याचे सांगण्यात आले आहे. जिल्ह्यातील इतर दोन जिल्हा परिषद शाळांचाही या उपक्रमात समावेश आहे. रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध अडचणी लक्षात घेऊन केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर न देता त्यांना रोजगारक्षम बनविणे, विविध कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला चालना देणे, या दृष्टिकोनातून विविध



उपक्रम राबविण्यात आले.

रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी म्हणाले की, भाई सथ्था नाईट हायस्कूलची यशोगाथा राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (निपा), नवी दिल्ली यांच्या ‘शिक्षण अनुभूती’ या फ्लिप बुकमध्ये समाविष्ट होणे ही संपूर्ण अहिल्यानगरसाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांना रोजगाराभिमुख कौशल्ये आणि विविध व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष साजरे होत असताना रात्रशाळेच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली जाणे हे महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याला खऱ्या अर्थाने अभिवादन आहे. प्राचार्य, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश मिळाले असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

भाई सथ्था नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनील सुसरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रोजगार मेळावे, विविध कौशल्य प्रशिक्षण उपक्रम, व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच विद्यार्थ्यांच्या आर्थिक स्तरात सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन यांचा समावेश आहे.

रात्रशाळेत शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी दिवसभर रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कामांमध्ये व्यस्त असतात. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाबरोबरच व्यावसायिक व कौशल्याधारित संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शाळेच्या माध्यमातून विविध उपक्रमांना चालना देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच रोजगाराच्या संधी, कौशल्यविकास आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक दिशा मिळण्यास मदत झाली. या विद्यार्थीकेंद्रित आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेत भाई सथ्था नाईट हायस्कूलची यशोगाथा ‘शिक्षण अनुभूती’ या राष्ट्रीय स्तरावरील फ्लिप बुकमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष साजरे होत असताना भाई सथ्था नाईट हायस्कूलची यशोगाथा राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक उपक्रमात समाविष्ट होणे ही विशेष अभिमानाची बाब आहे. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सर्वसामान्य, वंचित आणि शिक्षणापासून दूर असलेल्या घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचे कार्य केले. त्याच विचारांना पुढे नेत रात्रशाळा कामगार, कर्मचारी आणि विविध कारणांमुळे दिवसा नियमित शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात असल्याचे प्राचार्य सुनिल सुसरे यांनी सांगितले.

रात्रशाळेत विविध उपक्रम राबविण्यासाठी माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांचे मार्गदर्शन लाभले तसेच उपक्रमांसाठी सहकार्य करणाऱ्या मासूम संस्थेच्या संचालिका श्रीमती निकिता केतकर तसेच जन शिक्षण संस्था, मिटकॉन या संस्थांचे विशेष आभार मानण्यात आले

शिक्षण अनुभूती या मध्ये रात्र शाळेची यशोगाथा प्रसिद्ध झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, कार्याध्यक्ष अनंत देसाई, मानद सचिव सुमतीलाल कोठारी, संजय जोशी, डॉ.रमेश झरकर, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजितशेठ बोरा व पदाधिकारी यांनी शालेय समितीचे चेअरमन, शालेय समिती सदस्य व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.



## गुरुवाणी – ६८

**जिज्ञासेतूनच नवीन ज्ञान प्राप्त होते**

जंबूस्वामींनी सुधर्मा स्वामींना जिज्ञासेतून तीर्थंकर महावीर यांच्या विषयी माहिती विचारली आणि त्यानंतर सुधर्मा स्वामींनी त्यांच्या अनुभूतीतील भगवान महावीर यांचे सुंदर वर्णन केले. सुधर्मा स्वामींनाही माहिती होते, भगवान महावीरांची आयु साडे बहात्तर वर्षांची आहे. पण त्यांच्या अंतर्मनात जे महावीर आहेत, त्यांची आयु नाही. तीर्थंकरांची अपार शक्ती, ऊर्जेची चर्चा ते करतात. परमात्म्याच्या अलौकिक शक्तीला त्यांनी प्रस्तुत केले. ही शक्ती त्यांना सुमेरू पर्वतात दिसली. आज तीर्थंकरांची शक्ती येथे जिनेश्वरी अधिवेशनात दिसून येत आहे. तीर्थंकरांच्या शक्तीतून जिनेश्वरी विश्वेश्वरी बनेल. महासागरातून आपण पाणी घेऊ शकत नाही तर त्यात सागराचा दोष नाही. आपल्याला आपली झोळी मजबूत करायची यासाठी हे अनुष्ठान आहे. सुमेरू पर्वताला अनेक नावं आहेत. प्रत्येक नाम वैशिष्ट्यपूर्ण आहे. जिनेश्वरी शक्तीचे अनंत आयाम आहेत. हे आयाम सुधर्मा स्वामींनी शब्दरूपात सांगितले. तीर्थंकर मुक्त आहेत आणि मुक्त करतात. जिनेश्वरीचे वेड लागले पाहिजे. सत्ता, संपत्ती, भोग समोर आले तर काहींचे डोके चालत नाही. पण काही जण जिनेश्वरीत वेडे झालेले असतात. तीर्थंकरांच्या शक्तीचा सुमेरू पर्वताला गवसणी घालणे अवघड असते. आपल्याला शिखर यात्री बनायचे आहे. या शक्तीचा अनुभव घेण्याचे सूत्र एकच आहे ते म्हणजे आपल्यातील अहंकाराचा त्याग करायचा. तेव्हा तीर्थंकर कृपेची अनुभवी येईल. तोंडात मीठ असेल साखरेची गोड चव लागणारच नाही. आग्रह असेल तर अनुग्रह होत नाही. आग्रह सोडला तरच अनुग्रह होईल. आयुष्यात फक्त परमात्म्याचे गुणगान केले पाहिजे. आपण वाढदिवस साजरा करतो त्या व्यक्तीचे गुणगान करतो. खरं तर गुणगान फक्त आणि फक्त तीर्थंकरांचेच व्हावे. भगवंताच्या पुजाऱ्याची पूजा करायची नसते. यामुळे तो पुजारी त्याच्या भगवंतापासून दूर जातो. गुरूदेवांची ही भूमी तीर्थ भूमी आहे. या भूमीत माझ्या वाढदिवसाचा जयकारा मला आजिबात मान्य नाही. अशा व्यवस्था निर्माण झाल्या पाहिजेत. हृदयात महावीर आणि डोक्यात महावीरांचे विचार पाहिजे. आपल्याकडे तीर्थंकरांची अद्भुत वाणी आहे. ऊर्जा आहे. फक्त त्यांचेच गुणगान व्हावे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# डॉ. अर्चना तांबोळी सिंग यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर यश

नगर – युरोपियन अक्रीडेशन कौन्सिल फॉर कंटिन्यू मेडिकल एज्युकेशन यांच्यातर्फे चालवण्यात येणारा ऑनलाइन डिप्लोमा, ग्लोबल ओरल कॅन्सर डिप्लोमा उत्तम मार्कांनी डॉ. अर्चना तांबोळी सिंग पास झाल्या आहेत.



गेले दहा महिने ऑनलाईन चाललेल्या या आंतरराष्ट्रीय कोर्सला अमेरिकन मेडिकल असोसिएशन आणि युरोपियन युनियन ऑफ मेडिकल स्पेशलिस्ट यांच्यातर्फे आंतरराष्ट्रीय मान्यता आहे.

डॉ. अर्चना या अहिल्यानगर येथे मागील दीड वर्षापासून आपली सेवा देत आहेत. त्या कॅन्सर तज्ञ म्हणून नगर आणि परिसरात प्रसिद्ध आहेत. रेटीना तज्ञ डॉक्टर क्षितिज तांबोळी यांच्या पत्नी असून डॉक्टर सुचित व सौ. नेहा तांबोळी यांच्या स्नुषा आहेत. घुमरे गल्लीतील त्यांच्या स्वतःच्या दवाखान्याबरोबरच विखे पाटील मेडिकल कॉलेज, इंडो आयरिस आणि साईदीप या हॉस्पिटलमध्येही त्या सेवा देत असतात.

# स्वच्छता फेरीतून ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी केली जनजागृती

नगर – महानगरपालिकेच्या केडगाव येथील ओंकारनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी केडगाव परिसरातून स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत स्वच्छता फेरी काढत जनजागृती केली. तसेच परिसरातील प्लास्टिक व कचरा गोळा केला. स्वच्छता असे जेथे आरोग्य वसे तेथे, हम सब का एक ही नारा साफसुथरा हो देश हमारा, झाडे लावा झाडे जगवा, दुर्गंधीला घाला आळा पर्यावरणाचा ऱ्हास टाळा, झाडांचे रक्षण पर्यावरणाचे संरक्षण असे फलक हातात घेत विद्यार्थ्यांनी परिसरातील सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्वच्छता ही सेवा या अभियानाच्या माध्यमातून स्वच्छताविषयक जनजागृती व्हावी. तसेच सर्व नागरिकांनी स्वच्छ भारत अभियानात सहभागी व्हावे यासाठी विद्यार्थ्यांनी स्वच्छता फेरी काढली. तसेच विद्यार्थी व शिक्षकांनी परिसरातील प्लास्टिक व कचरा गोळा करत आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला.




महानगरपालिकेच्या केडगाव येथील ओंकारनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी केडगाव परिसरातून स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत स्वच्छता फेरी काढत जनजागृती केली.

फेरीनंतर मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छ भारत, कचरा वर्गीकरण, प्लास्टिक वापराचे धोके, स्वच्छतेचे फायदे, स्वच्छता विषयक आपल्या जबाबदाऱ्या याविषयी माहिती दिली. तसेच स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून करण्याचे सांगितले.

यावेळी सहशिक्षक शिवराज वाघमारे, ओंकारनगर अंगणवाडी सेविका विजया घोडके, मदतनीस रोहिणी दळवी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या स्वच्छता फेरीमध्येसहभाग घेत परिसरातील प्लास्टिक व इतर कचरा गोळा करून महानगरपालिकेच्या कचरा गाडीत दिला.



ईसीएचएस सेवा सुरू झाल्याबद्दल जय हिंद फाउंडेशन व त्रिदल सैनिक संघटनेच्या वतीने हॉस्पिटलमधील डॉक्टरांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# आजी-माजी सैनिकांच्या आरोग्यासाठी साई माऊली हॉस्पिटलमध्ये ईसीएचएस सेवा सुरू

**शहीदांच्या परिवारांनाही मिळणार तज्ज्ञ वैद्यकीय उपचार; कॅन्सरपासून हाडे, हृदय, मधुमेह, मूत्रपिंड व मेंदू-मणक्यांपर्यंत तज्ज्ञ उपचारांची सुविधा**

नगर – आजी–माजी सैनिक तसेच शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांना दर्जेदार व सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने शहराच्या भिस्तबाग येथील साई माऊली हॉस्पिटलमध्ये ईसीएचएस सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. या सुविधेमुळे आजी–माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना विविध आजारांसाठी तज्ज्ञ वैद्यकीय उपचारांचा लाभ घेता येणार आहे.

ईसीएचएस सेवा सुरू झाल्याबद्दल जय हिंद फाउंडेशन व त्रिदल सैनिक संघटनेच्या वतीने हॉस्पिटलमधील डॉक्टरांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. संतोष गिते (एम.डी. मेडिसिन), डॉ. वर्षा गिते (भुलतज्ज्ञ), डॉ. गणेश गिते (एम.एस. ऑर्थो), डॉ. विजयश्री गिते (आय स्पेशालिस्ट), डॉ. तुकाराम गिते (डेंटिस्ट) आणि डॉ. दीपली गिते (बी.ए.एम.एस.) यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉ. संतोष गिते म्हणाले की, सैनिक देशाच्या सीमेवर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कर्तव्य बजावत देशाच्या सुरक्षेसाठी मोठे योगदान देतात. त्यामुळे त्यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याची काळजी घेणे ही सामाजिक बांधिलकी आहे. सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी साई माऊली हॉस्पिटल कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

साई माऊली हॉस्पिटलमध्ये विविध आजारांवर उपचार करण्यासाठी कॅन्सरतज्ज्ञ, हाडांचे तज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, मधुमेहतज्ज्ञ, मूत्रपिंडतज्ज्ञ, मेंदू व मणक्यांचे तज्ज्ञ तसेच फुफ्फुसतज्ज्ञ यांसह विविध वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध आहे. आधुनिक वैद्यकीय सुविधांसह विविध रोगांचे निदान व उपचार सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याची माहिती हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

त्रिदल सैनिक संघटनेच्या वतीने गोवर्धन गर्जे यांनी साई माऊली हॉस्पिटल प्रशासनाकडून सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याची घेतली जाणारी काळजी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. ईसीएचएस सेवेमुळे आजी–माजी सैनिकांना तसेच शहीद परिवारांना मोठा आधार मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे म्हणाले की, आजी–माजी सैनिक आणि शहीद परिवारांच्या आरोग्यसेवेला साई माऊली हॉस्पिटलच्या माध्यमातून प्राधान्य दिले जाणार आहे. सैनिकांना उत्तम, वेळेवर आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी त्रिदलचे गोवर्धन गर्जे, संजय म्हस्के, सोमीनाथ गोल्हार, सिताराम गर्जे, रामचंद्र वायभासे, महादेव लांडणे, दिनकर बडे, लक्ष्मण ढाकणे, जालिंदर गोल्हार, राजेंद्र जायभाय, जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, धर्मा पालवे, शिवाजी गर्जे, संजय पाटेकर, संतोष शिंदे, गोरक्ष पालवे आदी उपस्थित होते. त्रिदल सैनिक संघटनेचे मेजर संजय म्हस्के यांनी आभार मानले.

# ‘ए आय जनजागृती सेमिनार’ रोटरी प्रियदर्शनीचा स्तुत्य उपक्रम

नगर – बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य झाला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील क्रांतीचे माध्यम ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी व छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज ऑफ इंजीनियरिंग नेप्ती अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेजच्या सभागृहात ए आय भविष्यातील संधी या विषयावर एक दिवसीय सेमिनारचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.



ए आय भविष्यातील संधी या विषयावर मार्गदर्शन करताना एआय तज्ज्ञ.

ए आय तज्ञ प्रणित भंडारी व पवन गव्हाणे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवन, व्यवसाय व नोकरीच्या ठिकाणी ए आयचा प्रभाव आणि सुरक्षित वापर कसा करावा याबद्दल या सेमिनार मध्ये मार्गदर्शन केले.

एआय तंत्रज्ञान वापरताना कोणती काळजी घ्यावी, डेटा सुरक्षितता आणि सायबर फ्राड पासून कसे सुरक्षित रहावे यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती यावेळी तज्ञांनी दिली. तीन तास हसत खेळत चाललेल्या या सेमिनार मध्ये जेन झीच्या सर्व शंकांचे निरसन ए आय टीम प्रणित भंडारी, वैष्णवी पाठक व पवन गव्हाणे यांनी केले. रोटरी क्लब आंतरराष्ट्रीयस्तरावर सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत असते तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे मिळावेत आणि ते जागतिक स्पर्धेत मागे पडू नयेत या उद्देशाने या सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे असे लिटरसी डायरेक्टर रोटेरियन गीता गिल्डा यांनी यावेळी सांगितले. व विद्यार्थी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. ए आय ही काम सोपे करणारी प्रणाली आहे पण या प्रणालीचा वापर करताना काय काळजी घ्यावी, ए आयचा उपयोग कुठे कसा करावा, दैनंदिन जीवनातील ए आयचे महत्त्व या सगळ्याची माहिती आज रोटरीच्या माध्यमातून आपल्या विद्यार्थ्यांना मिळाली अशा शब्दात रोटरी प्रियदर्शनीचे कौतुक छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज ऑफ इंजीनियरिंग नेप्ती अहिल्यानगरचे प्राचार्य डॉ.खर्डे सर यांनी केले.

या सेमिनारला इंजिनिअरिंगच्या विविध शाखांचे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच रोटेरियन डॉ. कुंदा हळबे, रोटेरियन गीता गिल्डा, रोटेरियन रजनी भंडारी, रोटेरियन स्मिता लोढा, रोटेरियन मीनल गंधे, रोटेरियन विभा तांबडे उपस्थित होते.

# नगरमध्ये ४ ऑक्टोबर रोजी ओशो ध्यानावर आधारित विनामूल्य अर्धदिवसीय ‘ध्यान दर्शन’ शिबीराचे आयोजन

नगर – सावेडी येथील ‘जीवन जागृती केंद्र’ या संस्थेच्या वतीने ४ ऑक्टोबर रोजी विनामूल्य अर्धदिवसीय ‘ध्यान दर्शन’ शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सद्गुरु ओशोंचे शिष्य व केंद्राचे संचालक स्वामी आत्मो कुटीर यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली हे शिबीर पार पडणार आहे.



हे शिबीर सावेडी येथील जीवन जागृती केंद्र (शांतीकुटीर, वृद्धेश्वर कॉलनी, सांदीपनी अकादमीच्या मागे, एकवीरा चौक, सावेडी, अहिल्यानगर) येथे सकाळी ८:३० ते दुपारी १२:३० या वेळेत होईल. हे शिबीर पूर्णपणे विनामूल्य असून उपस्थित सर्व साधकांसाठी चहा व नाश्त्याची उत्तम सोय करण्यात आली आहे.

तणावमुक्त व आनंददायी जीवनासाठी मार्गदर्शन : मानसिक शांतता, स्वास्थ्य आणि सकारात्मकतेच्या शोधात असलेल्या साधकांसाठी हे शिबीर विशेष उपयुक्त ठरणार आहे. यामध्ये दैनंदिन जीवनात परिणामकारक ठरणारे साधे व सोपे ओशोंचे विविध ध्यानविधी, तसेच ’ताओ’ व ’झैन’ पद्धतीच्या ध्यानाचा सराव करून घेतला जाईल. शिबिरात ध्यानाची भूमिका, ध्यान अवस्था, ध्यानाचे अनुभव यावर मार्गदर्शन होण्यासोबतच तणावमुक्तीसाठी प्रश्नोत्तरे व वैयक्तिक शंकांचे समाधान केले जाणार आहे. नव्याने ध्यान साधना सुरू करणाऱ्यांसाठी ही एक उत्तम संधी आहे.

पूर्वनोंदणी आवश्यक : शिबिरासाठी मर्यादित जागा असल्याने पूर्वनोंदणी आवश्यक आहे. इच्छुकांनी या विनामूल्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी शिवाजी साळवे (९८२२९६४८९५) किंवा नंदकुमार यन्नम (९८८१३०३७७१) यांच्याशी संपर्क साधावा.

# पेन्शनधारकांच्या काल्पनिक वेतनवाढीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आयुक्तांना निवेदन

**बैठक घेण्याबाबत संघटनेला आश्वासन**

नगर – पेन्शनधारकांना १ जुलैची काल्पनिक वेतनवाढ (नॉशनल इन्क्रिमेंट) लागू करण्यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निकालानुसार कार्यवाही करण्यात यावी, या प्रमुख मागणीसह पेन्शनधारकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पेन्शनर संघटनेच्या वतीने नाशिक विभागीय आयुक्तांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाच्या माध्यमातून न्यायालयाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र पेन्शनधारकांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली.



नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयात निवेदन देताना द. मा. ठुबे, सदुभाऊ सोनवणे, बाळासाहेब खैरनार, अनंतराव पाटील आदी.

पेन्शनर संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्ह्यातील पेन्शनधारकांचे नेते द. मा. ठुबे, जळगाव जिल्हाध्यक्ष सदुभाऊ सोनवणे, नाशिक जिल्हाध्यक्ष बाळासाहेब खैरनार आणि धुळे जिल्हाध्यक्ष अनंतराव पाटील यांच्या शिष्टमंडळाने नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयात अप्पर आयुक्त उज्वला कोळसे यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाने काल्पनिक वेतनवाढीच्या प्रश्नासह विविध जिल्ह्यांतील पेन्शनधारकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत सविस्तर चर्चा केली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने काल्पनिक वेतनवाढीबाबत दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने पात्र पेन्शनधारकांना त्याचा लाभ मिळणे आवश्यक आहे. मात्र, या संदर्भातील कार्यवाहीबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करून न्यायालयाच्या निर्णयानुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशीही चर्चा करण्यात आली. तसेच पेन्शनधारकांच्या अन्य प्रलंबित प्रश्नांवरही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. संबंधित प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंती शिष्टमंडळाने केली. पेन्शनधारकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विभागीय स्तरावर समन्वय साधण्याची गरज असल्याचेही शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले. अप्पर आयुक्त उज्वला कोळसे यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेत संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच जिल्ह्यांमधील शिक्षण अधिकाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक आयोजित करून पेन्शनधारकांच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

